# रोजगार हमीतून ‘उपजीविकेची हमी’ कोणाला? कशी?

## (कार्यकर्ते आणि अभ्यासकांच्या एकत्रित चर्चेसाठी टिपण)

प्रयास

**संसाधने व उपजीविका गट**

**पुणे**

# टिपणाची रूपरेषा


- प्रस्तावना १

- भाग १ : कार्यकर्ते व अभ्यासकांनी रोहयोबाबत मांडलेल्या समस्या व त्यावरील उपाय–पर्याय १

- भाग २ : निवडक शासन–निर्णयांची मांडणी– ३
  (१) नोंदणीसंबंधित शासन निर्णय
  (२) आखणी व नियोजनसंबंधित शासन निर्णय
  (३) कामांच्या प्रकारासंबंधित
  (४) अंमलबजावणीसंबंधित शासन निर्णय
  (५) नियमनसंबंधित शासन निर्णय
  (६) रोहयोच्या गाभ्याशी विसंगत असणारे शासन निर्णय
  (७) शासन निर्णयांचा एकत्रित आढावा

- भाग ३ : रोहयो कामांची इतर योजनांशी पूरक सांगड २१

- भाग ४ : कृती व धोरणवकिलीच्या शक्यता २२

# प्रस्तावना

दिनांक १७ व १८ मार्चला चंद्रपूर येथे वृक्षमित्र संघटनेच्या सहयोगाने होणाऱ्या चर्चासत्रासाठी सदर टिपण तयार केलेले आहे. अनुभवी कार्यकर्ते व अभ्यासकांशी तसेच पुणे जिल्ह्यातील काही शासकीय अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेतून, आणि रोहयोवरील शासन-निर्णयांचा (जीआर) व संशोधनपर लेखांचा प्राथमिक अभ्यास यातून पुढे आलेले मुद्दे या टिपणात संकलित केलेले आहेत.

रोहयो व त्यातील विविध समस्या यांची सखोल किंवा सर्वसमावेशक मांडणी या टिपणात केलेली नाही. चर्चासत्रात ज्या मुद्द्यांवर विचारविनिमय व कृती-रणनीतीची आखणी होणार आहे, त्याच मुद्द्यांवर या टिपणात भर दिलेला आहे. म्हणजेच दोन प्रमुख मुद्द्यांभोवती या टिपणातील मांडणी केलेली आहे : १) रोजगार हमी निधीचा उपयोग आदिवासी, दलित अशा वंचित घटकांना उपजीविकेची कायमस्वरूपी हमी मिळण्यासाठी कसा करता येईल? २) रोहयोच्या आखणीपासून-मूल्यमापनाच्या प्रक्रियेवर (केवळ अंमलबजावणीवर नव्हे) वंचित घटकांचे व त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या संस्था-संघटनांचे प्रभावी नियंत्रण कसे आणता येईल?

म्हणूनच चर्चासत्रासाठी नेमकी चौकट तयार करण्यासाठी या टिपणाचा उपयोग व्हावा अशी अपेक्षा आहे. त्या दृष्टीने एकत्रित चर्चेसाठी उपयोगी पडू शकतील अशा चार मुद्द्यांची मांडणी टिपणात केलेली आहे :

१. अभ्यासक व कार्यकर्त्यांनी मांडलेल्या रोहयोबाबतच्या समस्या

२. रोहयोवरील निवडक शासन-निर्णयांची मांडणी

३. रोहयो कामांची इतर योजनांशी पूरक सांगड

४. कृती व धोरणवकिलीच्या शक्यता

## भाग १. अभ्यासक व कार्यकर्त्यांनी मांडलेल्या रोहयोबाबतच्या समस्या व उपाय-पर्याय

या टिपणाच्या सुरुवातीलाच उल्लेख केल्याप्रमाणे कार्यकर्ते-अभ्यासक यांच्याशी झालेली चर्चा व रोहयोवरील संशोधनपर साहित्याचा अभ्यास यातून 'रोहयो-पुनरुज्जीवनाशी निगडित समस्यांची व्याप्ती तसेच त्यावरील उपाय-पर्यायांची व्याप्ती स्पष्ट होत गेली. चर्चासत्राची रूपरेषा या स्पष्टतेच्या आधारेच ठरवली असल्याने, सुरुवातीलाच ही व्याप्ती संक्षिप्तपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

### समस्याः

- **रोहयो कामांच्या मागणीशी संबंधित** : रोहयो कामाच्या मागणीसाठी करावी लागणारी नोंदणीची प्रक्रिया अतिशय गुंतागुंतीची व वेळखाऊ असते. त्यामुळे ती गरिबांच्या आवाक्यात राहत नाही. त्याचप्रमाणे जेव्हा काम मिळण्याची निकड असते, तेव्हा तातडीने काम सुरू होत नाही. वेळेवर तसेच मागणी करूनही स्थानिक परिसरात काम उपलब्ध न झाल्याने वंचित समूहांवर जगण्यासाठी देशोधडीला लागण्याची वेळ येते.
- **अंमलबजावणी-प्रक्रियेशी संबंधित** : काम सुरू झाले तरीही त्याचा फायदा खऱ्या-खुऱ्या गरीबांपर्यंत पोचण्यात अनेक अडथळे येतात. अंमलबजावणी प्रक्रियेतील भ्रष्टाचार व गैरव्यवहार हा त्यातील सर्वांत प्रमुख अडथळा प्रशासकी-यंत्रणा तसेच राजकीय पुढाऱ्यांचा वैयक्तिक स्वार्थासाठी कामांच्या आखणी व अंमलबजावणी तसेच नियमन प्रक्रियेत हस्तक्षेप हे या भ्रष्टाचाराचे मूळ असते. कामांचे मोजमाप, हिशेब, यंत्रसामग्रीच्या वापरामुळे कंत्राटदारांचा शिरकाव इत्यादी तांत्रिक व गुंतागुंतीच्या बाबी रोहयो मजुरांच्या आवाक्यात नसल्यामुळे त्याबाबत भ्रष्टाचार करणे सहज शक्य होते. शिवाय, प्रशासकीय यंत्रणा रोहयो मजुरांना कोणत्याही प्रकारे जाबदायी नसते. परिणामी, मजुरी अपरिमित काळ लांबणीवर पडणे, मिळाल्यास संपूर्ण व कामाच्या प्रमाणात न मिळणे, अत्यंत निकृष्ट दर्जाची कामे होणे, हा रोहयोबाबतचा सार्वत्रिक अनुभव होतो.
- **रोहयो कामांचा परिणाम न दिसणे** : निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे कागदोपत्री काम 'दिसूनही तसेच लक्षावधी रुपयांची गुंतवणूक होऊनही दुष्काळनिवारण व उत्पादक मत्तेची निर्मिती ही रोहयोची उद्दिष्टे पूर्ण होत नाहीत. जलसंधारण, फळबाग इत्यादी योजनांचा खरा लाभ प्रस्थापित व मोठ्या शेतकऱ्यांनाच पूर्णतः होतो. किंवा जास्त प्रमाणात होतो. जलसंधारणाच्या कक्षेत न येणारे शेतकरी, फळबागेत गुंतवणूक करण्याची ऐपत नसणारे अल्पभूधारक त्याचप्रमाणे कोणतेच उत्पादक साधन नसणारे भूमिहीन योजनेच्या परिघाबाहेरच राहतात.

- **रोहयो कामांचे स्वरूप :** रोहयो प्राम्रुयाने 'दुष्काळी योजन्ा म्हणूनच राबवली जाते. त्यामुळे दुष्काळात तात्पुरती मजुरी देणारा रोजगार (उदा. रस्ते) असेच रोहयो कामांचे स्वरूप राहते. प्रामुख्याने अकुशल कामांवर भर असल्याने तसेच कौशल्य प्रशिक्षणाची तरतूद योजनेत नसल्याने रोहयो कामांची व्याप्तीही मर्यादित राहते. अशा अकुशल कामातून मिळणारी कुटुंबाला मजुरीही सन्मानाने जगण्यासाठी पुरेशी नसते.
- **रोहयो कामांची आखणी :** 'कोणते काम्र हे ठरवण्याचा अधिकार स्थानिक गरिबांना नसतो. एकूणच कोणत्याही निर्णय-प्रक्रियेत गरिबांना स्थान नसते. त्यामुळे रोहयोचा उपयोग वंचिताच्या संसाधनाची उत्पादकता, त्याच्या क्षमता यात वाढ होऊन त्याद्वारे त्याचे दारिद्र्यनिर्मूलनासाठी न होता, तात्पुरत्या (तेही बेभरवशाच्या व अपुऱ्या) मजुरी व धान्यापुरताच मर्यादित होतो.
- **शासकीय पातळीवर रोहयोत केले जाणारे बदल :** रोजगार हमी निधीचा वर्षानुवर्षे वापर न होणे तसेच योजनेतर कामांसाठी तो वापरला जाणे, मजुरीचे दर कमी होणे (सुधारित दरपत्रक २००४), अकुशल बाबींची संख्या/प्रमाण कमी होणे, कंत्राटदारांना परवाना मिळणे, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत दिले जाणारे धान्याचे प्रमाण अपुरे असणे, कमी होणे यासारख्या बदलांमधून रोहयो निष्प्रभ करण्याचेच प्रयत्न होतात किंवा पद्धतशीरपणे केले जातात, हे दिसून येते. या सर्व बदलांशी संबंधित निर्णयप्रक्रियेत गरीबांच्या प्रतिनिधींना अथवा स्वयंसेवी संघटनांना कोणत्याही प्रकारे सहभागी करून घेतले जात नाही. सहभाग दिला गेलाच तरी तो नाममात्र असतो.
- **रोहयोबाबतचा अपप्रचार :** रोहयो निधी सहजपणे इतर कामांसाठी वळवता यावा, त्यासाठीची तरतूद कमी व्हावी यासाठी 'रोहयोला मागणी नाही, अनेक वर्षे कामे झाल्याने नवीन कामे घ्यायला जागाच नाही/वाव नाही, स्थानिक मजूर रोहयोऐवजी मजुरीच्या इतर शासकीय वा खाजगी कामांनाच प्राधान्य देतात, आता ग्रामीण भागाऐवजी शहरांतील रोजगार हमीला प्राधान्य द्यायला हवे, असे वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे मुद्दे आक्रमकपणे मांडले जातात.

## उपाय–पर्याय :

संघटित धोरण-वकिली, स्थानिक पातळीवरील कृती, जनजागृती व शिक्षणाचे व्यापक पातळीवर प्रयत्न अशा स्वरूपाचे अनेक पर्याय चर्चेतून पुढे आले. तेच इथे संक्षिप्तपणे मांडलेले आहेत:

### १) प्रभावी अंमलबजावणीसाठी (भ्रष्टाचार व गैरव्यवहार यांना आळा घालण्यासाठी) धोरणवकिलीचे संघटित प्रयत्न

#### अ) रोहयो निष्प्रभ करण्याच्या प्रयत्नांना संघटित विरोध

खऱ्या वंचितांना रोहयोचा फायदा होण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रयत्न, त्यासाठी रोहयोच्या अंगभूत बलस्थानांचा उपयोग, त्यासाठी आवश्यक असणारी धोरण-वकिली (रोहयोतील अंगभूत बलस्थाने = श्रमशक्तीतून ग्रामविकास, उत्पादक कामे व श्रमांची सांगड, पारदर्शकतेसाठीच्या तरतुदी, पंचायत-स्तरावरील रोजगार हमी समित्या व त्यातील अशासकीय सदस्यांच्या सहभागाची तरतूद, इ.)

#### ब) रोहयो कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी संघटित प्रयत्न

रोहयोच्या अंमलबजावणी प्रक्रियेतील भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी मोजमाप व हिशेबाची पद्धत ठरवण्याचा अधिकार व ते प्रत्यक्ष करण्याची जबाबदारी ते काम करणाऱ्या स्थानिक मजुरांकडे असावे यासाठीची धोरणवकिली

मोजमाप व हिशोबातील क्लिष्टता कमी होण्यासाठी साध्या-सोप्या निकषांचे पर्याय (जसे की, जमिनीच्या मालकीऐवजी कुटुंब हे मोजमापाचे एकक) सुचवणे व ते प्रत्यक्षात आणण्यासाठी संघटित धोरणवकिली.

#### क) रोहयो कामांची आखणी स्थानिक परिस्थितीनिहाय व्हावी यासाठी प्रयत्न

स्थानिक वंचित समूहांकडे रोहयो कामांच्या आखणी-अंमलबजावणीचे अधिकार व त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था आणि संघटनांकडे शासनांच्या विविध खात्यांमध्ये समन्वय घडवण्याची जबाबदारी, असावी यासाठी धोरणवकिलीचे प्रयत्न.

स्थानिक वंचित समूहांच्या पारंपरिक उपजीविकांशी निगडीत तसेच नैसर्गिक संसाधनांची उत्पादकता वाढवणाऱ्या कामांच्या आखणी-अंमलबजावणीचा आग्रह

### २) स्थानिक पातळीवरील कृतीचे पर्याय

- रोहयोच्या निर्णयप्रक्रियेवर स्थानिक मजुरांचे नियंत्रण येण्यासाठी स्वयंसेवी संस्था-संघटनांच्या माध्यमातून व्यापक स्तरावर प्रयत्न व त्याचबरोबर 'ग्रामसभा' सशक्त सक्षम करण्यासाठी सातत्याने प्रयत्न

- संवेदनशील प्रशासकीय अधिकाऱ्यांचे स्थानिक पातळीवर सहकार्य मिळवण्यासाठी प्रयत्न, त्याचबरोबर अशा अधिकाऱ्यांना स्वयंसेवी संस्था संघटनांमार्फत होणाऱ्या संघटित प्रयत्नांतही सहभागी करून घेण्याचे प्रयत्न
- रोहयोला संयुक्त वनव्यवस्थापन, स्वयं-सहायता गट अशा पूरक योजनांची जोड
- रोहयोच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थानिक वंचित समूहांचे (विशेषतः) स्वयंसेवी संस्था-संघटनांच्या माध्यमातून प्रशिक्षण

या सर्व समस्या व उपाय पर्यायांच्या पार्श्वभूमीवर रोहयोच्या सध्याच्या चौकटीत कोणती बलस्थाने व कोणत्या मर्यादा आहेत याची मांडणी करणे समुचित ठरावे.

# भाग २. रोहयोवरील निवडक शासन-निर्णयांची मांडणी

विविध कारणांमुळे रोजगार हमी योजना निष्प्रभ होत आहे, तसेच केलीही जात आहे. या पार्श्वभूमीवर, रोहयोच्या संपूर्ण कारभार-प्रक्रियेवर (केवळ अंमलबजावणीवर नव्हे) वंचितांसाठी काम करणाऱ्या संस्था-संघटनांचे नियंत्रण आले, तर योजनेतील भ्रष्टाचार व गैरव्यवहारांना आळा तर बसेलच त्याचप्रमाणे योजनेचा उपयोग वंचितांना उपजीविकेची कायमस्वरूपी हमी (केवळ तात्पुरत्या व मजुरी व धान्य या रूपाने मिळणाऱ्या रोजगाराची हमी नव्हे) देण्यासाठीही केला जाऊ शकेल. रोहयोचे खऱ्या अर्थाने पुनरुज्जीवन होण्याचा हा एक महत्त्वाचा मार्ग असू शकेल.

यासाठीच्या कोणत्या मुद्द्यांसाठी रोहयोच्या चौकटीचाच उपयोग करून घेता येऊ शकेल हे सूचित करण्याचा प्रयत्न या मांडणीतून केला आहे. योजनेची संरचना व त्यातील कायदेशीर तरतुदी यामुळे 'रोहयोत अनेक अंगभूत बलस्थाने (त्यादृष्टीने उपयुक्त ठरणारी) तर आहेतच. त्याचप्रमाणे काळानुसार केलेल्या बदलांमुळे निर्माण झालेल्या मर्यादा/पळवाटाही आहेत. अशी काही बलस्थाने व मर्यादांची मांडणी निवडक शासन निर्णयांच्या आधारे केलेली आहे.

'रोहयोची सर्वांगीण माहिती देण्रे हे या मांडणीचे उद्दिष्ट नाही. किंबहुना सदर टिपणात तशी माहिती देण्याची गरजही नाही. त्यामुळे टिपणामध्ये चर्चा करण्यासाठी शासन-निर्णयांची निवड करताना खालील चार प्रश्नांचे निकष लावले :

१. कारभार प्रक्रिया- (म्हणजेच आखणी, नोंदणी, अंमलबजावणी, नियमन) वंचिताभिमुख करण्यासाठी कोणते शा.नि.उपयोगी ठरू शकतील?
२. कारभार प्रक्रिया वंचिताभिमुख करण्याच्या दृष्टीने विशेषतः आदिवासी भागात उपयोगी पडू शकणारे शा.नि.कोणते असतील?
३. आदिवासी, दलित तसेच इतर भूमिहीन व अल्पभूधारकांना उपजीविकेची कायमस्वरूपी हमी मिळण्यासाठी कोणत्या शा.नि.चा प्रभावी उपयोग करून घेता येऊ शकेल?
४. त्याचप्रमाणे 'उपजीविकेची (रोजगाराची नव्हे) कायमस्वरूपी हमी व वंचिताभिमुख कारभार-प्रक्रिया या तत्त्वांना बाधा आणणारे (प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे) शा.नि.कोणते असतील?

या प्रश्नांशी निगडित निर्णयांच्या मांडणीचा त्याचप्रमाणे १९७७-२००४ या कालावधीतील विविध शासन निर्णयांचा एकत्रित आढावा घेतल्यास धोरणवकिलीच्या दृष्टीने काही महत्त्वाचे मुद्देही पुढे येतात. असे काही मुद्देदेखील या मांडणीत समाविष्ट केलेले आहेत. मांडणी करताना शासननिर्णयांची विभागणी 'कामांची आखणी व नियोजन, नोंदणी-कामे सुरू होणे, कामांचे प्रकार, अंमलबजावणीचे व एकूण कारभारप्रक्रियेचे नियमन' अशा ठळक टप्प्यांमध्ये केलेली आहे. या प्रत्येक विषयाशी संबंधित शासन-निर्णयाच्या मांडणीखाली, त्यावरील चर्चेसाठी काही प्रश्नही सुचवले आहेत.

शासन-निर्णयाचे क्रमांक जिथे उपलब्ध झाले तिथे दिले आहेत. परंतु काही शासन-निर्णयांसाठी निर्णय-क्रमांक उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्यासाठी 'सारग्रंथ १ (हे संकलन जिल्हास्तरावरील रोजगार हमी शाखेमध्ये तसेच तालुकास्तरावरील रोजगार हमी विभागात विनामूल्य उपलब्ध असते.) या रोहयो-शासन निर्णयांच्या शासकीय संकलनामधील परिच्छेद क्रमांकच दिलेले आहेत. (उदा. 'सा.ग्रं. १:२.१.४). हे परिच्छेद क्रमांकही संदर्भासाठी त्या-त्या शासन निर्णयापुढे दिलेले आहेतः

## १) नोंदणीशी संबंधित शासन निर्णय

बहुतेक वेळा 'मागणी करूनही काम मिळत नाही किंवा वेळ निघून गेल्यावर नोंदणी करण्याची प्रक्रिया गरिबांच्या आवाक्यापलीकडची असत्रे, यासारख्या अनुभवांनी रोहयोतील समस्यांची' नोंदी होते'. ही नोंदणीची प्रक्रिया गरिबांच्या विशेषतः आदिवासींच्या आवाक्यात आणण्यासाठी ज्यांचा उपयोग करून घेता येऊ शकेल असे काही शासन-निर्णय खाली दिलेले आहेत:

**नोंदणीची कार्यपद्धती (सा. ग्रं .१: ३.१.४)**

नोंदणी अधिकाऱ्यांनी नमुना प्रपत्र १ मधील सर्व माहिती अर्जात दिलेली असल्यास विहित प्रपत्रात अर्ज पाहिजे असा आग्रह धरू नये. जर नोंदणी करून घेण्याची इच्छा असलेली व्यक्ती लेखी अर्ज देऊ शकत नसेल तर नोंदणी अधिकाऱ्यांनी त्यांनी तोंडी सांगितलेला तपशील लिहून घ्यावा आणि लेखी अर्जाचा आग्रह न धरता नोंदणी करावी.

**भटक्या व विमुक्त जातीच्या व्यक्तींची नोंदणी** (सा. ग्रं .१: ३.१.५, शा.नि.,नि.वि.क्र.रोहयो-२०८८/प्र.१५२/ रोहयो-६,दि.६.२.१९८९) भटक्या व विमुक्त जमातीच्या पंचायतीने या जमाती पावसाळ्यात एका ठराविक गावात रहात असतात असे प्रमाणपत्र दिल्यास/ग्रामपंचायतीने दिल्यास देखील चालते.

**रोजगाराची मागणी करणाऱ्यांची नोंदणी करणे आणि त्यांना ओळखपत्र देणे हे विनामूल्य करण्यात येईल.** (सा. ग्रं .१: ३.१.१.७.२, शा.नि.,नि.वि.क्र.इजीएस-१०७८/८४/इएमपी-४/दि.१.७.१९७८)

**स्थानिक भाषेत रोजगाराची माहिती**

(सा. ग्रं .१: ३.१.१ , शा.नि.,नि.वि.क्र.इजीएस- १०७४/३६१६/पी-४)

गावात यंत्रणा अपुरी म्हणून तहसीलदारांनी गावातील उपलब्ध कोतवाल/मुखिया/प्रमुख कोणाचीही मदत घ्यावी. वन व आदिवासी भागात ढोलके वाजवून स्थानिक भाषेमध्ये रोजगाराची माहिती द्यावी.

**काम सुरू करण्याची कार्यपद्धती**

(सा. ग्रं १: २.११.२, शा.नि.,नि.वि.क्र.इजीएस-१०७४/३६१६/पी-४)

५० किंवा अधिक मजुरांना रोजगार पुरवण्याची गरज असेल तरच (रोजगार पुरवण्याच्या हमीला बाधा न आणता) नवे काम सुरू करण्यात यावे. तथापि ही अट वनीकरणाच्या कामांना लागू नाही. तसेच, डोंगराळ किंवा आदिवासी भागात २० किंवा २५ मजुरांनी कामाची मागणी केली तरीही काम सुरू करता येते.

- *आदिवासी भागात वरील शा.नि.चा उपयोग करण्यात कोणत्या अड्चणी येऊ शकतील? त्यावर काय उपाय करता येतील?*
- *रोहयो कामांची मागणी करणे वंचित समूहांसाठी सहज शक्य व्हावे यासाठी वरील शासन-निर्णय कसे वापरता येतील? त्यातील संभाव्य अडचणी व त्यावरील उपाय?*

## २) कामांची आखणी व नियोजन

रोहयो कामांचा उपयोग खऱ्या गरीब जनतेला होण्यासाठी, कामांचे नियोजन व आखणीही वंचित समूहांना केंद्रस्थानी ठेवूनच व्हायला हवी. कायद्याच्या सध्याच्याच चौकटीचा उपयोग त्यासाठी कसा करून घेता येईल, हे सुचविणारे काही शासन-निर्णय खाली दिलेले आहेत. वंचितांच्या हिताची कामे व्हावीत, व तीही वेळेवर, असा आग्रह धरण्यासाठी त्यांचा आधार घेता येईल, त्याचबरोबर शासनाचा रोहयो कामांचे नियोजन-प्राधान्यक्रम, त्यातील जनसहभाग याबाबतचा दृष्टिकोन काय याचीही झलक या शासन-निर्णयांतून मिळेल.

**जिल्हास्तरीय हमी :** (सा. ग्रं .१: २.४) रोजगाराची हमी जिल्हास्तरावर देण्यात आलेली असली तरीही योजना राबवताना ती शक्यतो पंचायत-समिती स्तरावर पाळली जाईल. पंचायत समिती क्षेत्रात काम उपलब्ध नसल्यास शेजारच्या पंचायत समिती क्षेत्रात १५-३० दिवस सतत चालू असणारे काम दिले जाईल.

**ग्रामीण रोजगार निधीतून ग्रामपंचायतीने कामे काढणे**

(सा. ग्रं .१: २.१३ , महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम ७७ व रोजगार हमी नियम १९७९)

सदर योजनेखाली घेतलेल्या कामांवर त्वरित रोजगार पुरविणे शक्य (एक्सिपडीयंट) नसल्यास जिल्हाधिकारी, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार निधी नियम, १९७४ खाली अनुज्ञेय असलेली कामे ग्रामपंचायतींना ग्रामीण रोजगार निधीतून हाती घेण्यास सांगू शकतील. ग्रामीण रोजगार निधीमध्ये निधी शिल्लक असल्यास जिल्हाधिकाऱ्यांचे निदेश ग्रामपंचायतींना बंधनकारक राहतील. तसेच समिती अधिकाऱ्यांनी निर्देश केलेल्या व्यक्तीस कामावर सामावून घेण्याचे बंधन ग्रामपंचायतीवर असेल.

**रोहयोअंतर्गत घ्यायची कामे**

(सा. ग्रं .१: ४.२ ,  शा.प.,नि.वि.क्र.रोहयो-१०८६/प्र.२२/इएमपी-१२, दि.१७.१०.१९८६)

जे काम खात्याच्या वार्षिक/पंचवार्षिक व बृहत् आराखड्यात अंतर्भूत आहे ते काम रोजगार हमी योजनेच्या दृष्टीने नियोजनातील काम समजण्यात येते.

**६०:४० या प्रमाणात न बसणारी कामे**

(सा. ग्रं .१: ४.४ , शा.नि.,नि.वि.क्र.रोहयो-२०८८/प्र.४५/रोहयो-,दि.२६.७.१९८८)

४.४.१ जी कामे खात्याच्या वार्षिक अर्थसंकल्पात मंजूर असतात अशी कामे जरी त्या संपूर्ण कामामध्ये अकुशल कामाचा भाग हा ६० टक्केपेक्षा कमी असला तरी त्या कामातील अकुशल भाग रोजगार हमी योजनेखाली घेता येऊ शकतो. अशा वेळेस या अकुशल भागावर होणाऱ्या खर्चाच्या २/३ एवढी रक्कम कुशल कामासाठी वापरली जाऊ शकेल. अशा कामाच्या बाबतीत एवढ्या कामाच्या भागापुरतीच जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासकीय मंजुरी द्यावी व या भागाचे अंदाजपत्रक रोहयोसाठी वेगळे करावे. रोहयोअंतर्गत घ्यावयाच्या कामाच्या अंदाजपत्रकातील अकुशल कामाचा दर रोहयो दरपत्रकाप्रमाणे असावा व कुशल भागाचा दर संबंधित खात्याच्या दरपत्रकाप्रमाणे असावा.

**रोजगाराचा अंदाज** (सा. ग्रं .१: ५.२.२ , शा.परि.,नि.वि.क्र.रोहयो-१०८६/प्र.५२/इएमपी-१२, दि. २६.७.१९८८ व क्र.रोहयो-२०८९/प्र.१०७/रोहयो-६,दि.२९.८.१९८९)

जिल्ह्यातील निरनिराळ्या पंचायत समिती क्षेत्रात सर्वसाधारण परिस्थितीमध्ये दिनांक १ ऑक्टोबर ते ३० सप्टेंबर या कालावधीसाठी पंचायत समिती निहाय रोजगाराच्या मागणीचा विचार करण्यात यावा. पंचायत समितीमध्ये समिती अधिकाऱ्यांच्या (तहसिलदारांच्या) अध्यक्षतेखाली सरपंच, तलाठी व ग्रामसेवक यांची मे महिन्यात किंवा त्याआधी मिटींग व्हावी. त्या-त्या गावातील रोजगाराची गरज व कामांचे स्वरूप याची या मिटींगमध्ये चर्चा होऊन त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांना अहवाल जातात. या अहवालाआधारे प्रत्येक पंचायत समिती क्षेत्रातील (तालुक्यातील) स्थानिक परिस्थितीचा विचार करून व मागील दोन वर्षाच्या आकडेवारीचा उपयोग करून पुढील वर्षाच्या रोजगाराच्या मागणीचा अंदाज बांधण्यात यावा. प्रत्यक्षात प्रत्येक तालुक्यात किती कामे रोजगाराची मागणी भागविण्याकरिता रोजगार हमी योजनेखाली चालू असावी लागतील हे ठरविण्यासाठी वरील मागणीच्या अंदाजात १० टक्के वाढ करावी. रोजगाराची मागणी अचानक वाढली तर नियोजनात पुरेशी कामे असावीत अशा तऱ्हेने रोजगाराच्या मागणीच्या अंदाजात ५० टक्के वाढ करून तेवढी कामे शेल्फवर केव्हाही चालू करता येतील अशा दृष्टीने तयार ठेवावीत.

**कामांचे स्वरूप व अग्रक्रम** (सा. ग्रं .१: ५.२.३ , शा.नि.,नि.वि.क्र.रोहयो-१०८६/प्र.१५/इएमपी-१२,दि.१७.४.१९८६ व क्र.रोहयो-१०८६ प्र.५२/इएमपी-१२/दि.२२-९-१९८६)

रोजगार हमी योजनेअंतर्गत उत्पादक स्वरूपाचीच कामे घेताना शासनाने काही अग्रक्रम ठरविलेले आहेत. हा अग्रक्रम व अग्रक्रमानुसार जिल्ह्यातील एकूण कामांच्या खर्चाशी या अग्रक्रमातील कामावरील खर्चाची टक्केवारी पुढे दर्शविल्याप्रमाणे आहे:

**(१) जलसंवर्धनाची कामे – ४० टक्के** (अ) मोठ्या आणि मध्यम प्रकल्पाच्या कालव्यांच्या कामांचा श्रमप्रधान भाग -यातही ज्या प्रकल्पाचे धरण पूर्ण होऊन पाणी कोंडले आहे अशा प्रकल्पाचे कालव्यास प्राधान्य द्यावे. ब) राज्यस्तर/स्थानिकस्तर लघुसिंचन तलाव, क) गावतळे, भूमिगत बंधारे, ड) पाझर तलाव, इ) जवाहर विहिरी

**(२) कृषिविषयक कामे – २० टक्के** (अ) मृद-संधारण आणि भू-विकास, ब) पाणवहाळ क्षेत्रांतर्गत घेतलेली मृद-संधारणाची कामे, क) लाभक्षेत्रातील भू-विकासाची कामे, ड) फलोत्पादन)

**(३) वनीकरण/सामाजिक वनीकरण – १५ टक्के** (अ) वन विभागाच्या जमिनीवर वनीकरण, (ब) इतर खात्यांकडील (महसूल, ग्रामपंचायतीकडील मोकळ्या जमिनीवर, पाटबंधारे खात्याकडील, जसे मोठ्या, मध्यम, लघु-सिंचन तलाव आणि पाझर तलावांच्या आसपास, कालव्यांच्या कडेने) जमिनीवर झाडे लावणे.)

**(४) पाणवहाळ क्षेत्राबाहेरील टंचाई परिस्थितीत मंजूर केलेली मृदसंधारणाची कामे –** (२)मध्ये अंतर्भूत

**(५) रस्ते व इतर – २५ टक्के** (अ) रस्ता योजनेत समाविष्ट असलेली (इ.स.१९८१-२००१) योजना रस्त्यांची कामे, यामध्ये किमान गरजा कार्यक्रमांतर्गत अंतर्भूत केलेली रस्त्यांची कामे (सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या अग्रक्रमाने), (ब) पूर नियंत्रण, (क) इतर)

**अपवाद**

१) जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थितीनुसार वरील १ ते ३ बाबींपैकी प्रत्येक बाबीवर वर उल्लेखल्याप्रमाणे टक्केवारी शक्य नसल्यास पहिल्या ३ बाबींची एकत्र टक्केवारी ७५ टक्के असली तरी चालेल. (सा. ग्रं .१: ५.२.४.१ , शा.नि.,नि.वि.क्र.रोहयो- २०८८/प्र.४५/रोहयो-६,दि.२६.७.१९८८)

२) आदिवासी व डोंगराळ भागात इतर कामे काढण्यास योग्य जागा उपलब्ध नसल्यास अशा भागात रस्त्यांच्या कामाची टक्केवारी ४० टक्केपर्यंत वाढविता येईल. (सा. ग्रं .१: ५.२.४.२ , शा.नि.,नि.वि.क्र.रोहयो-२०८९/व्रय२७/रोहयो-६,दि.८.३.१९८९)

३) अपगत व अवनत जमिनीतील विशेष वनीकरणाच्या कार्यक्रमाचे जलसंवर्धन व मृदसंधारणाचे महत्त्व लक्षात घेऊन या कामासकट वनीकरण कामांची टक्केवारी देखील विशेष वनीकरणाच्या कार्यक्रमामुळे १५ टक्केपेक्षा अधिक वाढत असली तरी चालेल. (सा. ग्रं.१: ५.२.४.४ )

***वर दिलेला अग्रक्रम १९८६ या वर्षासाठी होता. १९८९ मध्ये 'श्रमशक्तीतून ग्रामविकास कार्यक्रम' रोहयोअंतर्गत सुरू झाल्यामुळे या अग्रक्रमात खालीलप्रमाणे बदल झाला :***

**योजनेत समाविष्ट करावयाची कामे**

(सा. ग्रं .१: ५.२.६ , शा.नि.,नि.वि.क्र.रोहयो-२०८८/प्र.१०७/रोहयो-६,दि.२९.८.१९८९)

रोजगार हमी योजनेचा वार्षिक आराखडा तयार करताना त्यामध्ये समाविष्ट करावयाच्या कामांचा अग्रक्रम पुढीलप्रमाणे राहीलः

१) जवहार रोजगार योजनेखालील कामे,

२) श्रमशक्तीद्वारे ग्रामविकास कार्यक्रमातील कामे,

३) जवाहर विहिरींचा कार्यक्रम,

४) रोजगार हमी योजनेखालील अपूर्ण कामे खालील अग्रक्रमाने - (अ) खात्याच्या वार्षिक अर्थसंकल्पातील अपूर्ण कामे, (ब) ३ वर्षांहून अधिक काळ अपूर्ण कामे, (क) ३ वर्षांहून कमी काळ अपूर्ण असलेली कामे

५) खात्याच्या वार्षिक अर्थसंकल्पात मंजूर असलेल्या कामांपैकी रोजगार हमी योजनेखाली घेता येण्यासारखी नवीन श्रमप्रधान कामे

६) खात्याच्या नियोजनातील किंवा नियोजनबाह्य आराखड्यातील रोजगार हमी योजनेखाली घेता येण्यासारखी कामे,

७) रोजगार पुरविण्याकरिता घेता येतील अशी योजनाबाह्य कामे

८) योजनाबाह्य कामे (सा. ग्रं .१: ५.३.३.२)

नियोजनाबाहेरील कामे घेताना जलसंवर्धन, जलसंधारण तसेच मृदसंधारण, भूविकास, वनीकरण, सामाजिक वनीकरण इत्यादी कामे अग्रक्रमाने घ्यावीत. भूजल आणि वनसंवर्धनाची कामे उपलब्ध नसल्यास किंवा अशा प्रकारच्या कामांची मजूर क्षमता संपुष्टात आल्यावरच शक्य झाल्यास योजनाबाह्य रस्त्यांची कामे घेता येतील.

***(२००४ पर्यंतच्या शा.नि.मध्ये याशिवाय कोणताही शा.नि.अग्रक्रमाबाबतचा असल्याचे आढळले नाही.)***

**वार्षिक आराखडा तयार करण्याचे वेळापत्रक** (सा. ग्रं .१: ५.४ शा.नि.,नि.वि.क्र.रोहयो-२०८९/प्र.१०७/रोहयो-६, दि.२९.८.१९८९) रोजगार हमी योजनेतील कामांचा वार्षिक आराखडा तयार करताना खालीलप्रमाणे वेळापत्रक पाळावे-

१) १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्टपर्यंत सर्व संबंधित जिल्हास्तरीय यंत्रणांकडून कामांची व मजूर क्षमतेची माहिती घेऊन प्रारूप आराखडा तयार करावा

२) १ सप्टेंबर ते १५ सप्टेंबरच्या काळात विभागीय आयुक्तांकडे आराखडा पाठवावा. विभागीय आयुक्तांनी त्याचे परीक्षण करून अभिप्राय संबंधित जिल्हाधिकाऱ्यास तात्काळ कळवावेत.

३) १५ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर या कालावधीत वार्षिक आराखड्यास जिल्हास्तरीय समितीची मान्यता घेण्यात यावी. जर या काळात जिल्हास्तरीय रोहयो समितीची बैठक होऊ शकली नाही तर विभागीय आयुक्तांनी दिलेले अभिप्राय लक्षात घेऊन आराखड्यातील कामे १ ऑक्टोंबरपासून सुरू करण्यात यावीत, व नंतर कार्योत्तर मंजुरी जिल्हास्तरीय समितीची घ्यावी.

४) कामांना मंजुरी

(सा. ग्रं .१: १.५ , शा.नि.,नि.वि.क्र.रोहयो-२०८९/प्र.१०७/रोहयो-६, दि.२९.८.१९८९)

ज्या कामांचे नकाशे व अंदाजपत्रके यांसा सक्षम तांत्रिक अधिकाऱ्यांनी तांत्रिक मंजुरी दिली असेल अशा कामांना रोजगार हमी योजनेखाली मंजुरी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना रुपये १० लाखापर्यंत आहेत व विभागीय आयुक्त यांना रुपये १५ लाखांपर्यंत आहेत. त्यावरील खर्चाची कामे शासनामार्फत मंजूर करून घ्यावी लागतात.

५) पुढील कार्यवाही (सा. ग्रं .१: ५.५ ) जिल्ह्याच्या नियोजनाची पुस्तिका तयार झाल्यावर त्याची एक प्रत शासनास पाठवावी. तालुका नियोजनाची पुस्तिका तालुका स्तरावरील कार्यकारी यंत्रणांना व जिल्हा नियोजनाची पुस्तिका जिल्हा स्तरावरील संबंधित कार्यकारी यंत्रणांना द्यावी.

***खालील शा.नि. टंचाई परिस्थितीचा विचार कामांच्या नियोजनात कसा केला जातो याचे उदाहरण आहे. टंचाई परिस्थितीत हे प्रत्यक्षातही यावे, याचा आग्रह धरण्यासाठी या शा.नि.चा उपयोग व्हावा.***

**टंचाई परिस्थितीचा विचार** (शा.नि.क्र. व नियो.-२००२/प्र.१३२/रोहयो-६,दि.२६ मे २००३, नियोजन विभाग)

प्रचलित आदेशानुसार मागील ३ वर्षांतील प्रत्यक्ष दिलेला रोजगार लक्षात घेऊन १० टक्के जादा रोजगाराचा आराखडा (शेल्फ) तयार करण्यात येतो. तथापि, सध्याची टंचाई परिस्थिती विचारात घेता उपरोक्त १० टक्के ऐवजी ५० टक्के अधिकचा आराखडा तयार करण्यात यावा. असा आराखडा तयार करताना मजुरांची कामाची मागणी कोणत्या क्षेत्रात जास्त प्रमाणात येईल, कोणत्या भागात अधिक कामे काढावी लागतील याचा परिपूर्ण विचार करण्यात यावा. परिणामतः मजुरांना तात्काळ रोजगार पुरविण्यास अडचणी निर्माण होणार नाहीत. त्याकरिता जिल्हाधिकाऱ्यांशी विचारविनिमय करून कामाची क्षेत्रे निश्चित करणे आवश्यक आहे. ते करताना जिल्ह्याचे पुढीलप्रमाणे तीन भाग करण्यात यावेत-

१. हिरवे क्षेत्र- ज्या क्षेत्रात मजुरांची रोजगाराची मागणी अत्यंत कमी असेल ते क्षेत्र २. पिवळे क्षेत्र - ज्या क्षेत्रात मजुरांच्या कामाची मागणी हंगामी स्वरूपात वाढते ते क्षेत्र ३. लाल क्षेत्र- ज्या क्षेत्रात जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त काळ व सर्वात जास्त मजूर उपस्थिती असते असे क्षेत्र. या भागात जास्तीत जास्त कामाचे नियोजन असावे व कार्यारंभ आदेश देऊन कामे तात्काळ सुरू करण्यात यावीत.

- *कुशल व अकुशल कामांची आखणी करताना कंत्राटदार वा अधिकाऱ्यांनी गैरफायदा घेऊ नये (६०:४० या प्रमाणात न बसणारी कामे हा शासन निर्णय) यासाठी काय सुरक्षात्मक उपाय (preventive/ protective measure) सुचवता येईल?*
- *'रोजगाराचा अंदाज', 'वार्षिक आराखडा तयार करण्याचे वेळापत्रक' यासारख्या शासन निर्णयाचा उपयोग १ ऑक्टोबर-३० सप्टेंबर या कालावधीत सलगपणे व पुरेशी रोहयो कामे उपलब्ध होण्यासाठी कसा करता येईल?*
- *रोहयो कामांचे अग्रक्रम ठरवताना त्या-त्या भागातील वंचितांच्या 'उपजीविका शाश्वतीला' प्राधान्य मिळावे म्हणून काय करता येईल?*
- *तालुका/जिल्हा नियोजनाच्या पुस्तिकांसारख्या शासकीय दस्तावेजांचा उपयोग रोहयो कामांच्या नियोजन प्रक्रिया वंचितांसाठी पारदर्शक व जाबदायी होण्यासाठी कसा करता येईल?*
- *प्रत्येक उपाय करताना कोणत्या संभाव्य अडचणी येऊ शकतील? त्या कशा हाताळता येतील?*

## ३) कामांचे प्रकार

काही रोहयो कामांचा उपयोग गरिबांना तात्पुरता रोजगार देण्यासाठी म्हणजेच पोटासाठी देशोधडीला लागण्यापासून वाचवण्यासाठी होतो. तो निश्चितच मोलाचा आहे. जिथे विकासाच्या कोणत्याच सुविधा पोचलेल्या नाहीत अशा दुर्गम भागात रोहयो कामांच्या माध्यमातून पाणी, रस्ते अशा प्राथमिक सुविधा पोचणेही निश्चितच महत्त्वाचे आहे.

पण याच्या पुढचा-अतिशय आवश्यक टप्पा आहे तो म्हणजे उपजीविकेची दीर्घकालीन हमी मिळण्याचा, वंचितांच्या हाती उत्पादक साधने येण्याचा, त्याचप्रमाणे त्यांच्या उपजीविकेच्या पारंपरिक कामांची उत्पादकता वाढून सन्मानाने जगण्याची

शाश्वती' मिळण्याचा. कोणत्या प्रकारची' कामे रोहयोखाली घेतली जावीत/जातात हा मुद्दा या संदर्भात म्हणूनच महत्त्वाचा आहे. कोणकोणत्या प्रकारची कामे रोहयोखाली घेतली जाऊ शकतात, कोणती कामे आदिवासी भागासाठी विशेष करून विहित केलेली आहेत, याबद्दलचे काही शासन-निर्णय खाली दिलेले आहेत. (या सर्व शा.नि.मधून रोहयोंतर्गत घेतल्या जाणाऱ्या सर्व कामांचा समावेश झाला नसण्याची शक्यता आहे. सर्व शासन-निर्णयांचा एकत्रित आढावा घेताना ही मर्यादा दूर करण्याचा प्रयत्न केलेला आहे.) शासनाचा कामांचा प्राधान्यक्रम कसा बदलत गेलेला आहे, त्याचा उपयोग खऱ्या-खुऱ्या गरिबांना दीर्घकालीन हमी देण्यासाठी होऊ शकेल का, अशा काही प्रश्नांचा विचार करण्यासाठी या शासन-निर्णयांचा संदर्भ उपयोगी पडावाः

**उत्पादक कामाची व्याख्या (सा. ग्रं .१: ५.१ )**

''आदिवासी/बिगर-आदिवासी भागात उत्पादक स्वरूपाच्या अपूर्ण कामाला प्रथम प्राधान्य देण्यात यावे. काम मागणाऱ्याला काम देण्याच्या हमीनुसार उत्पादक स्वरूपाची अपूर्ण कामे नसतील तरच नवीन उत्पादक स्वरूपाचे काम हाती घेण्यात यावे.

**वनीकरणाची कामे** (सा. ग्रं .१: १३.१.१, १३.१.४, महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम,१९७७,कलम७(२)(एक) व शा.नि.,नि.वि.क्र. इजीएस-१०८४/३६१६/पी-४,दि.२०.९.१९७४)

रोजगार हमी अधिनियमानुसार रोजगार हमी योजनेंतर्गत फक्त उत्पादक स्वरूपाची कामे घेता येतात. वनीकरणाची कामे उत्पादक स्वरूपाची असल्यामुळे अशी कामे रोजगार हमी योजनेंतर्गत घेता येतात.

रोजगार हमी योजनेंतर्गत घ्यावयाच्या वन विकासाच्या कामांच्या संदर्भात विभागीय वन अधिकाऱ्यांनी महिन्यातून किमान एकदा जिल्हाधिकाऱ्यांना स्वतः भेटण्याची पद्धत ठेवावी.

**वन जमिनीवरील/आदिवासींच्या जमिनीवरील कामे**

(शा.परि.,नि.वि.क्र.इजीएस- १०८१/१८०/डी-३३, दि.१.४.१९८२)

वन जमिनीवरील साफसफाई, सपाटीकरण आणि बंडींगची कामे, त्याचप्रमाणे आदिवासींना देण्यात आलेल्या इतर प्रकारच्या जमिनीवरील सपाटीकरण व बंडींगची कामे शासन परिपत्रक, नियोजन विभाग, क्रमांक इजीएस-१०८१/१६५/डी-३३, दिनांक ८ फेब्रुवारी १९८२ (वैयक्तिक प्रकारच्या कामाच्या संदर्भात) व शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक इजीएस-१०८२/९१/डी-३३, दिनांक २० जुलै १९८२ मधील सूचनांनुसार करण्यात यावी.

**आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनीवर फळझाडे लावण्याची योजना:**

(सा. ग्रं .१: १२.५.१, शा.नि.फ.व सा. व. वि.क्र. एचआरटी-२२३५२/८३, दि. १-२-१९८४)

आदिवासी उपाययोजनेमध्ये समावेश असलेल्या आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनीवर फळझाडे लावण्याची योजना राबविली जाते. या योजनेसाठी लागणारा खर्च प्रथम रोजगार हमी निधीतून करण्यात येतो व नंतर झालेल्या एकूण खर्चाच्या ५० टक्केपर्यंतचा अनुज्ञेय खर्च फलोत्पादन विभागामार्फत रोजगार हमी योजना निधीत परत केला जातो.

**अनुसूचित जाती/जमातीच्या शेतकऱ्यांच्या शेतावरील कामे** (सा. ग्रं .१: २१.८ शा.परि,नि.वि.क्र.इजीएस-१०८३/सी-आर-२११/इएमपी- १२,दि.१७.७.१९८४)

प्रत्येक आर्थिक वर्षाच्या शेवटी रोजगार हमी योजनेखाली अनुसूचित जाती आणि जमातींच्या शेतकऱ्यांच्या जमिनीवर निरनिराळ्या प्रकारे किती कामे घेतली आणि त्यावर किती खर्च झाला याबाबतची माहिती प्रत्येक वर्षाच्या एप्रिल महिन्याच्या अखेरपावेतो शासनाकडे पाठवावी. यामध्ये एकूण मंजूर कामाचे प्रभावित क्षेत्रांपैकी किती क्षेत्र अनुसूचित जाती व जमातीच्या शेतकऱ्यांचे आहे तसेच पूर्ण झालेल्या कामाच्या क्षेत्रांपैकी किती क्षेत्र अनुसूचित जाती व जमातींच्या शेतकऱ्यांचे आहे व आजपर्यंत अनुसूचित जाती आणि जमातीच्या शेतकऱ्यांच्या शेतांवर झालेला खर्च इत्यादींचा समावेश असावा.

**गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यांच्या विशेष कृती कार्यक्रमांतर्गत भातशेती बांधदुरुस्तीची कामे**

(सा. ग्रं .१: १२.९ शा.नि.,नि.वि.क्र.रोहयो-२०८९/प्र.१३/इएमपी-४,दि.२८.३.१९८९)

१. गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यांतील विशेष कृती कार्यक्रमानुसार प्रकल्प क्षेत्रातील अनुसूचित जाती व जमाती यांच्या जमिनीवर भातशेतीच्या बांधाच्या दुरुस्तीची कामे रोहयोंतर्गत घेण्यात यावीत. (मर्यादा किमान ०.१० हेक्टर जमीन)

२. अनुसूचित जाती व आदिवासी यांच्याव्यतिरिक्त इतरांच्या जमिनीवर ज्यावेळी भातशेतीच्या बांध दुरुस्तीचे काम घेण्यात येईल त्यावेळी ही कामे १० हेक्टरपर्यंत जमीन असलेले भूधारक यांच्या शेतापुरती मर्यादित ठेवण्यात यावीत.

**कोरडवाहू शेतकऱ्यांच्या जमिनीवर मृदसंधारणाची कामे**

(शा.नि.,कृ.व.स.वि.क्र.मृदस-१०८७/(सीआर-२)/१६-ए,दि.२.७.१९८७)

११.११.४.२ मोठ्या, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात ज्या भागात पाटबंधारे प्रकल्पाचे विशेषतः कालव्याच्या शेवटच्या भागास पाणी प्रत्यक्षात मिळत नाही किंवा पुढील पाच वर्षांत मिळण्याची शक्यता नाही, अशा भागात कोरडवाहू जमिनीची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी पाणलोट विकास कार्यक्रमाच्या तत्त्वावर मृद्संधारणाची कामे करण्यास परवानगी आहे.

**पायवाटा** (सा. ग्रं .१: १४.११.१, १४.११.२ , शा.नि.,नि.वि.क्र.रोहयो-१२८८/प्र.१६७/रोहयो-६, दि.३-२-१९८९)

गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यांतील आदिवासी लोकांना दळणवळणाची सोय उपलब्ध व्हावी या दृष्टिकोनातून पायवाटा बांधण्यास परवानगी दिलेली आहे.

अशा छोट्या रस्त्यांची रूंदी १.८ मीटर इतकी असावी. त्यांची चढण १:८ पेक्षा जास्त कठीण नसावी. त्यावर आवश्यक तेथे साकव (पादचारी पूल) बांधावेत.

**ग्रामीण झोपड्यांचा कार्यक्रम** (सा. ग्रं .१: २१.११ शा.नि.,नि.वि.क्र.इजीएस-११७५/इएमपी-इजीएस,दि.७-६-१९७५)

ग्रामीण भागातील भूमिहीन मजुरांना दिलेल्या जमिनीवर घरे बांधून देण्याचा कार्यक्रम शासनाने (महसूल विभागाने) घेतला आहे. या योजनेमध्ये लाभधारकांना स्वतः माती/दगड माती/स्थानीय स्तरावर वापरण्यात येणारे परंपरागत साहित्य वापरून घराच्या भिंती आणि झावळ्यांचे छप्पर बांधावयाचे आहे. या लाभधारकांना मदत म्हणून उन्हात सुकविलेल्या परंतु न भाजलेल्या विटा (भेंड) तयार करण्याचे काम घेता येईल. ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमाखाली न भाजलेल्या विटा बनवण्यासाठी (भेंड) जिल्हाधिकारी स्थानिक मजूर लावू शकतात. त्या मजुरांना रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरी देता येते, किंवा विटा तयार करण्यामध्ये आलेला प्रत्यक्ष खर्च (यांपैकी जो कमी असेल तो) एवढा देता येईल. शक्यतो जिल्हाधिकाऱ्यांनी विटा तयार करण्याची कामे गावनिहाय द्यावीत.

**ग्रामीण भागात पाणीपुरवठा व मलनिःसारण कामे (''क्र वर्ग नगरपालिकांच्या हद्दीत घ्यावयाची कामे)** (सा.ग्रं. १: २१.६, २१.५, शा.नि.,नि.वि.क्र.इजीएस-१०७८/२०८/इएमपी-४, दि.९.१.१९७९)

ग्रामीण भागात पाणीपुरवठा व मलनिःसारण योजनेच्या कामांची श्रमप्रधान कामे रोजगार हमी योजनेंतर्गत घेता येतील. मात्र, संबंधित ग्रामपंचायतीने अशा कामांच्या कुशल भागाची कामे हाती घेण्यासाठी निधीची तरतूद केली असली पाहिजे.

**सर्वंकष पाणवहाळ क्षेत्रविकास कार्यक्रम (काऊडेप)**

(शा.नि.,नि.वि.क्र.इजीएस-१०८२/९१/का-३३,दि.२०-७-१९८२)

या कार्यक्रमाचा उद्देश पाणवहाळ क्षेत्राचा एकात्मिक व सर्वंकष विकास करण्याचा असून त्याची आखणी करताना पाणवहाळ क्षेत्र (छोटे क्षेत्र किंवा सूक्ष्म पाणवहाळ क्षेत्र) अथवा प्रवाह, तलाव, जॅक-विहीर, बुडकी यांच्या परिसरात येणाऱ्या जमिनीच्या विकासावर आधारित प्रकल्प आखण्यात येतील. या प्रकल्पात सामाजिक वनीकरण, इंधन, चारा व कुरण विकास व फळझाडे ज्यायोगे जल व मृद-संधारण शक्य होते अशा गोष्टींचाही समावेश राहील. मुंबई भूसुधारणा योजना अधिनियम, १९४२ च्या कलम ३(१) नुसार स्थापलेल्या जिल्हा मंडळाकडे या कार्यक्रमाची सर्व कार्यकारी सूत्रे असतील, मंडळाचे सभासद पुढीलप्रमाणे असतील- (अ) जिल्हाधिकारी (ब) जिल्हा कृषि अधिकारी, (क) विभागीय मृद्संधारण अधिकारी, व (ड) राज्य शासनाने नियुक्त केलेले दोन अशासकीय सदस्य.

**जवाहर विहिर योजना**

(सा. ग्रं .१: ११.१९ , शा.नि.,ग्रा.वि.वि.क्र.विहीर-१०८९/सीआर-१०८२/५२, दि.१७.४.१९८९)

रोजगार हमी योजनेखाली लक्षित लाभार्थी हे दारिद्र्यरेषेखालील आणि सध्याच्या एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम यादीत समाविष्ट झालेले लहान आणि सीमांतिक शेतकरी (अनुसूचित जाती/जमाती व मुक्त वेठबिगार या व्यतिरिक्त) असतील. या योजनेखालील पात्र लाभार्थ्यांकडे स्वतःच्या मालकीची किमान १ हेक्टर जमीन असावयास हवी. ज्यावेळेस लाभार्थ्यांकडे एक हेक्टरपेक्षा कमी जमीन असेल, त्यावेळेस हे एक हेक्टर लाभक्षेत्र पूर्ण करण्याकरिता दुसऱ्या अल्पभूधारकाची जमीन एक हेक्टर क्षेत्र पूर्ण करण्यास आवश्यक त्या प्रमाणात या योजनेखाली घेता येईल.

रोजगार हमीशी निगडीत फळबाग योजना (संदर्भ- फलोत्पादन कार्यक्रमाची ओळख- कृषी आयुक्तालयाने १९९८मध्ये छापलेली पुस्तिका)

राज्यात कोरडवाहू शेती करणाऱ्या अल्प आणि अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांसाठी हा कार्यक्रम मुख्यतः राबविला जात आहे. गरीब आदिवासी आणि अनुसूचित जातीतील तसेच नवबौद्ध शेतकऱ्यांचा व महिलांचा या कार्यक्रमात विचार केला जात आहे. लहान शेतकऱ्यांबरोबर मोठ्या शेतकऱ्यांनाही या योजनेचा लाभ मिळत आहे. विश्वस्त कायद्याखालील संस्था, सहकारी कायद्याखालील प्रमाणित झालेल्या मान्यताप्राप्त संस्था (सहकारी साखर कारखाने व सूत गिरण्या वगळून) यांनाही या योजनेचा लाभ घेता येतो.

शेतकऱ्यांनी विहित नमुन्यातील अर्जसोबत जमिनीचे ७/१२ व ८-अचे उतारे व योजना यशस्वीपणे राबविणार असलेबद्दलचे करारपत्र अर्जासोबत जोडणे गरजेचे आहे. जमीन कूळ कायद्याखाली येत असल्यास योजना राबविण्यासाठी जमीन मालक व कूळ या दोघांची संमती (रु.२०/- च्या स्टॅम्पवर सक्षम अधिकाऱ्यांच्या समक्ष शपथ पत्र) आवश्यक राहील.

**पाणवहाळ क्षेत्रातील कामे**

(नियोजन विभाग (शा.नि.क्र.वानियो-२००२/प्र.१३२/रोहयो-६,दि.२६ मे २००३)

२. रोजगार हमी योजनेंतर्गत पाणवहाळ क्षेत्रातील कामे घेण्यास अद्यापही वाव आहे. ही बाब विचारात घेता रोजगार हमी योजनेंतर्गत पाणवहाळ क्षेत्राची कामे प्राधान्याने घेण्याची कार्यवाही करावी. त्याकरिता सध्याच्या टंचाई परिस्थितीत ८ कि.मी. परिसरातील कामे घेण्याची अट ५ कि.मी.पर्यंत शिथिल करण्यात येत आहे.

३. बऱ्याच जिल्ह्यांचा आराखडा पाहता असे दिसून येते की, बरीच कामे वर्षानुवर्षे आराखड्यात अंतर्भूत केली जातात. मात्र, प्रत्यक्षात ती रोहयो कामे सुरू झालेली नाहीत. त्यास्तव जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींशी विचारविनिमय करून अशी जुनी कामे आराखड्यातून वगळून त्या जागी संबंधित लोकप्रतिनिधींनी सुचविलेली त्या प्रवर्गातील नवीन कामे समाविष्ट करावीत.

**जलबांध**

(ग्राम विकास व जलसंधारण विभाग शा.नि.क्र. बंधारा १००४/१२६/प्र.क्र.६०/जल-१)

जलबांध हा जलसंधारणाचा एक नवीन उपचार म्हणून अंतर्भाव करण्याबाबत उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. जलबांधाची संकल्पना तात्कालीन मंत्री (जलसंधारण), श्री. बाबासाहेब धाबेकर यांची असून, त्यांच्या मोलाच्या कामगिरीबाबत या जलबांधास 'धाबेकर जलबांध' असे नाव देण्यात येईल.

**महात्मा ज्योतिराव फुले जल व भूमी संधारण अभियान**

(ग्राम विकास व जलसंधारण विभाग शा.नि.क्र.जलसं.१००३/प्र.क्र.११२/जल-८, दि.२० मे २००४) राज्यातील ग्रामीण भागातील जल व भूमी संधारण, पाणलोट व्यवस्थापन, पडीक जमीन विकास, वृक्ष लागवड इत्यादी नैसर्गिक साधनसंपत्तीत सुधारणा व वाढ करण्याच्या दृष्टीने महात्मा ज्योतिराव फुले जल व भूमी संधारण अभियान दि. १ मे २००२ पासून स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था तसेच ग्रामीण भागातील जनतेचा लोकसहभागाद्वारे राबविण्यासाठी सुरू करण्यात आले. राज्यातील जलसंधारण कार्यक्रमाला गती देण्यासाठी ग्रामीण भागातील सामान्य जनतेमध्ये जल भूमी आणि इतर नैसर्गिक साधनसंपत्ती संवर्धनाबाबत आस्था निर्माण व्हावी व या संदर्भात केलेल्या चांगल्या कार्याचा गौरव व्हावा या उद्देशाने जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्राम पंचायती, स्वयंसेवी संस्था व शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना बक्षिस देण्याबाबत संदर्भ क्र. २ अन्वये शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.

**कामासाठी अन्न** (नियोजन विभाग शा.नि.क्र. रोहयो-१८ जून २००४/प्र.६४/रोहयो१०)

केंद्र शासनाच्या कृषी मंत्रालयाने ''संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना-विशेष घटक योजनेंतर्गत दुष्काळग्रस्त जिल्ह्यात अतिरिक्त रोजगार निर्मितीच्या कामांसाठी ३ लाख मे.ट.(गहू) त्यांच्या दिनांक २ जून २००४ च्या पत्रान्वये उपलब्ध करून देण्याबाबतच्या सूचना, भारतीय खाद्य निगम यांना दिल्या आहेत.

- *वरील पैकी कोणत्या कामातून केवळ तात्पुरती रोजगार निर्मिती होईल? उपजीविकेची दीर्घकालीन हमी मिळण्यासाठी अशा कामांना कोणते पर्याय सुचवता येतील? त्यातील संभाव्य अडचणी व त्यावरील उपाय कोणते असतील?*
- *यातून केवळ तात्पुरती रोजगार निर्मिती होते अशा कामांचा उपयोग देखील त्या-त्या भागातील वंचितांना थेट पूर्ण व फायदा व्हावा (प्रस्थापितांऐवजी) यासाठी काय करता येईल?*
- *खास आदिवासी भागासाठी विहित केलेल्या कामांतून आदिवासींना दीर्घकालीन/कायमस्वरूपी उपयोग होतो का? तो होण्यासाठी काय करावे लागेल?*
- *भूमिहीनांना तसेच अल्पभूधारकांना उपजीविकेची हमी मिळावी म्हणून कोणत्या कामाचा आग्रह धरावा लागेल?*

## ४) रोहयो कामांची अंमलबजावणी

रोहयो कामांसाठी वापरली जाणारी यंत्रसामग्री आणि कंत्राटदारांमुळे होणारा भ्रष्टाचार, सरकारी यंत्रणेची अनास्था आणि यामुळे अंमलबजावणी प्रक्रियेतील (म्हणजेच कामे सुरू होऊन मजुरी मिळेपर्यंत) पारदर्शकतेचा अभाव, गैरकारभार हा अनुभव जवळजवळ सार्वत्रिक आहे. या पार्श्वभूमीवर खाली दिलेले शासन निर्णय, मजुरी-हिशेब इत्यादी तसेच कॉन्ट्रॅक्टर्सच्या संदर्भात स्थानिक पातळीवर वंचितांचे नियंत्रण कसे आणायचे याचा विचार व आखणी करण्यासाठी उपयोगी पडावेत:

### १. मजुरी

**हिशेबपद्धत दर्शविणारा बोर्ड लावणे** (सा. ग्रं.१: ८.३.१२, शा.नि.,नि.वि.क्र. इजीएस-१०७५/इएमपी-इजीएस (दोन) दि.२९.११.१९७५)

कामाच्या ठिकाणी मजुरीचा हिशेब करावयाची पद्धत दर्शविणारा बोर्ड लावण्यात यावा, म्हणजे सर्व मजुरांना त्यांना देण्यात येणाऱ्या मजुरीबाबत कळून येईल. शिवाय, मिळालेली मजुरी ते पडताळून पाहू शकतील. बोर्डावर एक ब्रास खडीकाम अथवा एक घनमीटर मातीकाम यांचे तंतोतंत विनिर्देश (स्पेसिफिकेशन्स) आणि हिशेबाची पद्धत दाखविण्यात यावी. तसेच हिशेबाचे एक उदाहरणही बोर्डावर मजुरांच्या माहितीसाठी दाखवावे. अशी माहिती बोर्डावर दाखविणे, गैरसोयीचे अथवा अवघड असल्यास वरील माहिती एका मजबूत व टिकाऊ वहीमध्ये लिहावी, व ती तपासणी अधिकाऱ्यांना उपलब्ध करून द्यावी.

**कामाचे प्रात्यक्षिक**

(सा. ग्रं .१: ८.३.११ , शा.प.,नि.वि.क्र. इजीएस-१९७८/७०/इएमपी-४,दि.१-६-१९७८)

मजुरांना त्यांनी करावयाचे काम व त्यासाठी मिळणारी मजुरी याची माहिती व्हावी म्हणून कामाच्या ठिकाणी अशा कामाचे प्रात्यक्षिक करून ठेवण्यात यावे. उदाहरणार्थ, एका घनमीटरचा खड्डा खणून त्यासाठी काय मजुरी मिळेल अशा प्रकारचे प्रात्यक्षिक असावे.

**हजेरीपत्रकाबाबत काही सूचना**

(सा. ग्रं .१: ८.२.५ , शा.नि.,नि.वि.क्र. रोहयो-१०८२/८०/डेस्क-३७, दि.३.९.१९८२)

कामावर ज्या-ज्या गावातील मजूर अधिक संख्येने असतील त्या-त्या गावाच्या संबंधित तलाठी/ग्रामसेवक/पोलिस पाटील यांच्याकडे हजेरीपत्रकाची दुसरी प्रत (कार्बन प्रत) पाठविण्यात यावी व ती दुसरी प्रत संबंधित तलाठी/ग्रामसेवक/पोलिस पाटील यांनी त्यांना प्राप्त होताच गावाच्या चावडीमध्ये ग्रामपंचायत कार्यालयामध्ये लावावी.

**मजुरी देताना गैरप्रकारास आळा घालण्याकरिता करावयाची उपाययोजना** (सा. ग्रं .१: ८.३.१ , ८.३.१.२ , शा.परि.,नि.वि.क्र.इजीएस-१०८२/सीआर-९०/का-९, दि.२२.११.१९८२)

पोलिस पाटील, सरपंच, तलाठी व ग्रामसेवकांना त्या-त्या गावाच्या महसूल हद्दीत रोजगार हमी योजनेखाली चालू असलेल्या कामावर मजुरांना मजुरी वाटपाकरिता हजर राहून निरीक्षक म्हणून काम पाहण्यास शासनाने प्राधिकृत केले आहे. कामाच्या जागेवरील, अंमलबजावणी यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी पंधरवड्याची मजुरी कोणत्या दिवशी व केव्हा देण्यात येणार आहे हे पोलीस पाटील, सरपंच, तलाठी व ग्रामसेवकांना कळविले पाहिजे.

**तक्रार अर्जासाठी नोंदवही** (सा. ग्रं .१: १८.८.१ , १८.८.२ , शा.नि.,नि.वि.क्र. इजीएस-१०८२/सीआर-१२६/डेस्क-३१,दि.३०.११.१९८२)

रोजगार हमी योजनेच्या कामावरील गैरव्यवहार व लाचलुचपतीच्या संदर्भात येणाऱ्या तक्रारी नोंदविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात एक कायम स्वरूपाची नोंदवही आदेशात विहित केलेल्या प्रारूपानुसार ठेवण्यात यावी. आलेल्या तक्रारीवर त्वरित कार्यवाही करण्यात येईल व पाठपुरावा केला जाईल याची काळजी जिल्हाधिकाऱ्यांनी घ्यावी. दर महिन्यास जिल्हाधिकाऱ्यांनी अशा प्रकरणांचा आढावा घ्यावा. या आढाव्याचा अहवाल जिल्हास्तरीय रोजगार हमी समितीच्या बैठकीत दर महिन्याला ठेवण्यात यावा. अशा आढाव्याची प्रत शासनाला पुढील महिन्याच्या ५ तारखेच्या आत पाठविण्यात यावी.

आलेल्या तक्रारींची नोंद योग्य वेळी घेतली जाते, नोंदवहीतील नोंदीनुसार वेळीच व योग्य रीतीने आढावा घेतला जातो आणि शासनाला जिल्हाधिकाऱ्यांकडून वेळीच अहवाल सादर केला जातो याची आयुक्तांनी खात्री करून घ्यावी.

**आठवड्याच्या कोणत्याही दिवशी मजुराला कामावर घेणे**

(सा. ग्रं .१: २१.१५ , शा.परि.,नि.वि.क्र.इजीएस/व्हीजीएल-१०८२/२१/डेस्क-१५,दि.१.२.१९८३)

आठवड्याच्या कोणत्याही दिवशी रोजगार हमी योजनेंतर्गत मजुराने काम मागितल्यास, आठवड्याच्या पहिल्या दिवशीच (सोमवार) अथवा आठवड्याच्या विहित दिवशीच त्याने काम मागितले नाही या सबबीवर कोणत्याही परिस्थितीत त्याला काम नाकारू नये.

**कामावर मजुरीचे दरपत्रक लावणे**

(शा.प.,नि.वि.क्र. रोहयो-१०८६/प्र.२१/इएमपी-१२, दि.२८.८.१९८६, ८.३.२)

रोजगार हमी योजनेंतर्गत सुरू असलेल्या कामावर त्या कामाच्या प्रकाराशी संबंधित असलेल्या मजुरीचे दर दर्शविणारा फलक या कामांवर लावणे आवश्यक आहे. या फलकावर त्या कामाशी संबंधित असणाऱ्या मजुरांच्या सर्व बाबींचे दर दर्शविणे आवश्यक आहे.

**मजुरी आठवडी बाजाराच्या अगोदरच्या दिवशी देणे (सा. ग्रं .१: ८.३.४ )**

रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजुरांना त्यांच्या दैनंदिन गरजेच्या वस्तू खरेदी करणे सोयीचे व्हावे म्हणून मजुराला त्या गावातील/परिसरातील आठवडी बाजाराच्या आदल्या दिवशी मजुरी देण्यात यावी.

**हजेरी लिपिक/मुकादम नेमणेबाबत (सा. ग्रं .१: ८.३.४ , दि.२६.५.१९९३)**

रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरांची हजेरी मांडणे व ओळख पटविणे या इतक्याच कामाकरिता हजेरी सहाय्यकाची नेमणूक सन १९७८ पासून करण्यात येत होती. तद्नंतर शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. इसका-११९२/प्र.२६३/रोहयो-३, दि.२६.५.१९९३ अन्वये शासनाने निर्णय घेतलेला आहे की, हजेरी सहाय्यकाच्या नियुक्त्या न करता कामावरील मजुरांची हजेरी मांडण्याकरिता सदर शासन निर्णयात दिलेल्या तरतुदीनुसार त्याच कामावरील एका शिक्षित मजुरास हजेरी मांडण्याचे काम द्यावे व त्यास प्रतिदिनी रु. ५ अतिरिक्त मजुरी द्यावी.

**रोजगार हमी योजना मजुरांना वेळेवर मजुरी अदा करणे**

(शास.नि.क्र.रोहयो-२००४/प्र.१४/रोहयो-७,दि.२९ ऑक्टोबर २००४ - सचिव (रोहयो) यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पाठवलेला शासन निर्णय)

रोजगार हमी योजना कामावरील मजुरांना वेळेवर मजुरी द्यावी असे आदेश शासनाने वेळोवेळी काढले आहेत तरीदेखील मजुरी वेळेवर दिली जात नाही अशा स्वरूपाच्या फार तक्रारी विविध स्तरावरून शासनाकडे वेळोवेळी येत असतात.

सबब जिल्हाधिकाऱ्यांना आदेश देण्यांत येत आहेत की, त्यांनी आवश्यकतेनुसार आठवड्याला, महिन्याला यंत्रणेचा आढावा घेऊन मजुरांना मजुरी वेळेत होते किंवा नाही हे पहावे व मजुरांना मजुरी वेळेवर होईल याकडे स्वतः लक्ष द्यावे. अन्यथा नाईलाजास्तव जिल्हाधिकाऱ्यांना महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ नुसार जबाबदार धरण्यात येईल.

## २. कंत्राटदारी –नियंत्रण

**स्थानिक मजूर लावणे** (सा. ग्रं .१: १३.२.४ ,१९८२)

आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनीवर फळझाडे लावण्याची योजना ह्या कार्यक्रमाची अंमलबजावणी रोजगार हमी योजना पद्धतीनुसार मजूर लावून करण्यात यावी. तथापि, रोजगार हमी योजनेंतर्गत नोंदणी केलेले मजूर न मिळाल्यास इतर नोंदणी न केलेले मजूर या कामावर लावता येतील. परंतु हे असे मजूर महाराष्ट्रातील रहिवासी असावेत. कोणत्याही परिस्थितीत कंत्राटदारामार्फत ही कामे करू घेऊ नयेत.

**कामे खात्यामार्फतच राबवणे**

(सा. ग्रं .१: २.१९.१ , २.१९.२ , शा.नि.,नि.वि.क्र.इजीएस-१०७४/३६१६/पी-४)

रोहयोंतर्गतची सर्व कामे खात्यामार्फतच राबवण्यात यावीत. ठेकेदारांमार्फत राबवण्यात येऊ नयेत. अत्यावश्यक तेथेच अपवाद उदा.सांडवे,घळभरणी अशी कामे फुटकळ पद्धतीने ठेकेदारांमार्फत किंवा गँगमार्फत करून घ्यावीत.

ठेकेदारांमार्फत काम करून घेणारी शासनाची सर्व खाती, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या यांनी दिलेल्या कामावर स्थानिक मजूर लावण्याबाबत ठेकेदारांना आदेश द्यावेत. ठेकेदारांना कंत्राट देताना करून घेण्यात येणाऱ्या कॉन्ट्रॅक्ट डीडमध्ये जास्तीत जास्त स्थानिक मजूर लावण्याच्या अटीचा समावेश करावा.

**जंगल कामगार सोसायटीमार्फत कामे न घेणे** (सा. ग्रं .१: १३.२.७)

या कार्यक्रमासाठी रोजगार हमी योजनांतर्गत घेण्यात येणारी कामे ही कोणत्याही परिस्थितीत थेट जंगल कामगार सोसायटीमार्फत घेण्यात येऊ नयेत. जंगल कामगार सोसायटीच्या मजूर सभासदांना काम देऊन वन विभागाने खात्यामार्फत ही कामे करून घ्यावीत व त्यांना मजूर वाटप रोजगार हमी योजना नियमांप्रमाणे करण्यात यावे.

- *रोहयोची अंमलबजावणी प्रकिं या वंचितांसाठी पारदर्शक, जाबदायी व सहभागी करण्यासाठी या सर्व शासन-निर्णयांचा निश्चितच उपयोग होऊ शकेल. असा उपयोग करताना कोणकोणत्या अडचणी येऊ शकतात? त्या हाताळण्याचे पर्याय कोणकोणते असावेत?*
- *या सर्व शासननिर्णयांखेरीज कोणत्या तरतुदींचा नव्याने विचार करावा लागेल?*
- *गैरव्यवहार वा भ्रष्टाचाराची शक्यताच समूळ नाहीशी करण्यासाठी रोहयोच्या संरचनेतच काही बदल सुचवावे लागतील का? असे (व्यवहार्य बदल घडवण्यासाठी काय करता येईल?*

## ५) नियमन

रोहयो खऱ्या अर्थाने वंचिताभिमुख होण्यासाठी केवळ अंमलबजावणी-प्रक्रियेवर नियंत्रण आणणे/असणे पुरेसे होणार नाही, तर रोहयोची संपूर्ण कारभार-प्रक्रियाच त्यासाठी पारदर्शक, जाबदायी व सहभागी (अर्थातच वंचित समूहांसाठी) असावी लागेल. योजनेच्या मूळ संरचनेतच त्यासाठी इंटरनल चेक्स् (अंगभूत बंध) आहेत. त्यांचा पुरेपूर व प्रभावी वापर करणे हे रोहयो वंचिताभिमुख करण्याचे महत्त्वाचे साधन होऊ शकते. याचसंबंधीचे काही शासन-निर्णय खाली मांडलेले आहेत. योजनेच्या संनियंत्रणासाठी व जनसहभागासाठी असलेल्या काही तरतुदींचा त्यात समावेश आहे. यातील दक्षता-पथकांसारख्या काही तरतुदी आज केवळ कागदावर नावापुरत्या उरलेल्या आहेत. विविध प्रकारचे नियमित व प्रासंगिक अहवाल जनतेपर्यंत किंवा जनसंघटना-संस्थांपर्यंत पोचण्याऐवजी सरकारी फायलीमध्ये राहिल्याने संनियंत्रणाचा तरतूदही शब्दशः 'कागदावरच राहिलेली आहे. तर राज्य-जिल्हा-पंचायत व गावपातळीवरील समित्या तरतुदी राजकीय हितसंबंधामुळे भ्रष्ट व निष्प्रभ झालेल्या आहेत. खरे पाहता या तरतुदींचा परिणामकारक वापर झाला तर रोहयोच्या केवळ कारभार-प्रक्रियेवरच नव्हे, तर धोरण-प्रक्रियेवर देखील वंचितांचे नियंत्रण आणता येऊ शकते. रोहयोच्या अंगभूत संरचनेची मृतवत् झालेली ताकद पुनरुज्जीवित कशी करायची, या प्रश्नाच्या संदर्भात या शासन-निर्णयांचा उपयोग करून घेता येऊ शकतो.

**तपासणी व देखरेख** (सा. ग्रं. १: १.८)

या योजनेखाली घेतलेल्या कामांची तपासणी व पाहणी करण्याकरिता विभागीय स्तरावर आयुक्तांना अधिकार असून त्याकरिता विशेष कार्य अधिकारी व पदसिद्ध उप आयुक्त (रोहयो) यांची प्रत्येक विभागात नेमणूक करण्यात आलेली आहे. त्याव्यतिरिक्त जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उपजिल्हाधिकारी, तहसिलदार व कार्यान्वयीन यंत्रणेचे पर्यवेक्षी अधिकारी यांनी रोजगार हमी योजना कामांची तपासणी व पाहणी करावयाची असते. गैरव्यवहारास आळा बसावा या दृष्टिकोनातून विभागीय आयुक्तांना विशेष अधिकार दिलेले आहेत. तसेच, सचिव (रोहयो), नियोजन विभाग, यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय दक्षता समिती नेमण्यात आली आहे. राज्य व विभागीय स्तरावर दक्षता पथके नेमण्यात आली आहेत. याव्यतिरिक्त मजुरांना हजेरीपुस्तिका-नि-फोटोसहित ओळखपत्रे देण्यात आली आहेत. यायोगे गैरव्यवहारांस आळा बसण्यास मदत होते.

**रोजगार हमी योजनेचे संनियंत्रण** (सा. ग्रं. १: ७.१)

संनियंत्रणाची जबाबदारी- रोजगार हमी योजनेचे राज्य स्तरावरील संनियंत्रण नियोजन विभागाने, विभागीय स्तरावरील संनियंत्रण विभागीय आयुक्तांनी व जिल्हा स्तरावरील नियंत्रण जिल्हाधिकाऱ्यांनी करावयाचे असते.

**वार्षिक नियोजनेची (कृती आराखडा) अंमलबजावणी** (सा. ग्रं. १: ७.९.३)

नियोजन विभागाच्या आदेशाप्रमाणे, रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीसाठी तपशीलवार नियोजन करावयाचे असते. त्यानुसार, जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यासाठी एक कृती आराखडा तयार करावयाचा असतो. प्रत्यक्षात या आराखड्याप्रमाणे मजुरांना कामे उपलब्ध करून द्यावी लागली किंवा नाही/देता आली किंवा नाही, या बाबींची चिकित्सा होणे आवश्यक आहे. नियोजनाच्या संदर्भात तयार केलेला कृती आराखडा, प्रत्यक्षात उपलब्ध करून दिलेली रोजगार हमी योजनेची कामे व मजुरांची मागणी इत्यादी बाबींचा मेळ बसला नाही तर कृती आराखडा सदोष होता का, याचे उत्तर मिळेल. तसेच, मजुरांची रोजगाराची मागणी पूर्ण करण्यासाठी अपूर्ण कामे

उपलब्ध असताना, नवीन कामे सुरू करण्यात आली का याचीही चिकित्सा त्यावरून होते. अपूर्ण कामे नियत वेळात पूर्ण करण्यासाठी आवश्यक नियंत्रण या विश्लेषणातून करता येईल.

**व्यवस्थापन माहिती पद्धती** (सा. ग्रं. १: ७.३)

संनियंत्रण परिणामकारक रीतीने व्हावे यासाठी शासनाने खाली नमूद केलेल्या विविध अहवालांद्वारे व्यवस्थापन माहिती पद्धती विहित केलेली आहे. (अ) साप्ताहिक अहवाल, (ब) मासिक प्रगती अहवाल (प्रपत्र ''३अ, ''३ ब्र व ''३ क्र नुसार), (क) मासिक प्रगती अहवाल तारेने पाठवायचा, (ड) दक्षता पथकाला अहवाल (याची माहिती प्रकरण क्र.१७ मध्ये आहे), (इ) पतमर्यादेसाठी त्रैमासिक अहवाल (याची माहिती प्रकरण क्र.६मध्ये आहे.), (ई) षण्मासिक अहवाल, (उ) वार्षिक प्रगती अहवाल

हे सर्व अहवाल व आकडेवारी तालुका स्तरावर (रोहयो तहसीलदार) तसेच जिल्हा स्तरावर (रोजगार हमी शाखा) कोणालाही बघण्यासाठी (मागितल्यास) उपलब्ध असतात.

**आदिवासी उपयोजना**

(सा. ग्रं. १: ७.५.५ ,शा.परि.,नि.विभाग क्र. इजीएस-२१७६/२५४/डी-३७,दि.३०.१.१९८१)

ज्या जिल्ह्यांमध्ये आदिवासी उपयोजना क्षेत्र असेल, त्या जिल्ह्यातील संबंधित अधिकाऱ्यांनी आदिवासी क्षेत्रांमध्ये रोजगार हमी योजनेवर झालेल्या खर्चासंबंधीची, धान्यासंबंधीची मनुष्यदिवसांची इत्यादी आकडेवारी मासिक प्रगती अहवालामध्ये कंसामध्ये एकूण आकड्याच्या खाली द्यावी.

**कुशल खर्चाच्या बाबी: पर्यवेक्षणावरील खर्च**

(सा. ग्रं. १: २.१८, मुद्दा क्र. ८ , शा.परि.नि.वि.क्र.इजीएस१२७८/१४/इएमपी५,जि.४-५-१९७८)

अ) आस्थापना खर्च रोहयो कामाच्या कोणत्याही खर्चाच्या २ टक्केच्या वर असता कामा नये.

त्या खात्याचा निधी अपुरा असल्यास-

ब) गाड्यांचे पेट्रोल, डिझेल यावरील खर्च

क) खात्याच्या नेहमीच्या कर्मचारी वृंदाची प्रवास भत्यावरील देयके

ड) मुद्रण-लेखनसामग्री

या तीन बाबींवरील एकूण खर्च रोहयोवरील कामाच्या एकूण खर्चाच्या दीड टक्क्यांवर जाता कामा नये.

प्रत्यक्षात हा खर्च जास्त दाखवला जातो व त्याद्वारे रोहयो निधी रोजमार्गाने गैरवापर करता येऊ शकतो, असा शासकीय अधिकाऱ्यांचा अनुभव आहे. या पार्श्वभूमीवर भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी या शासन-निर्णयाचा उपयोग कसा करता येईल याचा विचार होऊ शकतो.

**जनतेचा सहभाग** (सा. ग्रं. १: १.११)

रोजगार हमी योजना कायद्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यात एक जिल्हा रोजगार हमी समिती व प्रत्येक पंचायत समितीस्तरावर तालुका रोजगार हमी समितीची स्थापना करण्यात येते. यात मागासवर्गीय, मजूर व शेतमजूर संघटना आणि स्त्रियांना उचित प्रतिनिधित्व दिले जाते. त्या व्यतिरिक्त रोहयो अधिनियमातील तरतुदींची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता शासनास विविध बाबींवर सल्ला देण्यासाठी राज्य रोजगार हमी परिषद स्थापण्यात आलेली आहे. याशिवाय विधानमंडळाने एक खास विधानमंडळ समिती नेमली असून ती समिती या योजनेच्या कामावर लक्ष ठेवते. यांची नेमणूक जिल्हाधिकारी पालकमंत्र्यांच्या सल्ल्याने करतात.

गावपातळी ते राज्यपातळीवरील समित्या व त्यातील अशासकीय सदस्यांच्या सहभागाची तरतूद हे निश्चितच रोहयोतील महत्त्वाचे बलस्थान आहे. ही तरतूद परिणामकारकपणे वापरत आल्यास निश्चितच व्यापक स्तरावर देखील रोहयोची कारभारप्रक्रिया (आखणी ते नियमन) खऱ्या अर्थाने वंचिताभिमुख होऊ शकते. आणि वर दिलेले जनतेच्या सहभागाचे' तत्त्व प्रत्यक्षात येऊ शकते. या समित्यांशी संबंधित शासन निर्णय खाली दिलेले आहेत. हे केवळ शासन निर्णय नसून त्यांना रोजगार हमी अधिनियमाचा म्हणजेच प्रत्यक्ष कायद्याचा देखील आधार आहेः

**समित्या** (सा. ग्रं. १: १९.१ - २०.९, महाराष्ट्र विधानसभा नियमावली नियम. १६३ ते १९३ , २४१ व २४२) रोजगार हमी योजनेच्या कामकाजाचे अधीक्षण, मार्गदर्शन व समन्वय इत्यादींसाठी खालील समित्या नेमण्यात आलेल्या आहेत-

## १) महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद (सा. ग्रं. १: १९.२)

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ मधील कलम ४(१) प्रमाणे या परिषदेची रचना करण्यात येते. या परिषधेमध्ये अध्यक्ष, सभापती व २६ सदस्य (यातील दोन अनुसूचित जाती/जमाती/भटक्या व विमुक्त जाती यांपैकी) असतात. या सर्वांची नेमणूक शासनाकडून केली जाते. परिषदेची कर्तव्ये खालीलप्रमाणे असतात-

१. महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमांच्या व रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीचा नियत-कालिक आढावा घेणे व पर्यवेक्षण करणे. (महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम,१९७७,कलम ४)
२. महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाच्या व रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीविषयी शासनाला साथ देणे.
३. रोजगार हमी योजनेचे मूल्यमापन हाती घेणे यासाठी महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेची, ग्रामीण मजुरांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीची आणि विशेषतः रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीशी संबंधित आकडेवारी गोळा करणे.
४. अधिनियमाच्या अंमलबजावणीशी व योजनेशी संबंधित विशिष्ट प्रश्न किंवा समस्या यांचा अभ्यास करण्यासाठी परिषद एक किंवा अधिक अभ्यासगट नेमण्यासाठी राज्य शासनाला शिफारस करणे.
५. महाराष्ट्र रोजगार अधिनियम १९७७ मधील कलम ५ अन्वये स्थापित करण्यात आलेल्या जिल्हा स्तरावरील समित्यांच्या कामांचा समन्वय करणे.

महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषदेची बैठक सर्वसाधारणपणे ३ महिन्यांतून एकदा व गरज पडल्यास अधिक वेळा होते. (शा.नि.,नि.वि.क्र. इजीएस-१०७९/इएमपी-८, दि.६.४.१९७९)

## २) जिल्हा व पंचायत समिती स्तरावरील रोजगार हमी समित्या

(सा. ग्रं. १: १९.३ , शा.नि.,नि.वि.क्र.इजीएस १०८५/१६/इएमपी-८,दि.२८.५.१९८५) (शा.नि.,नि.वि.क्र.इजीएस-१३८६/२७/इएमपी-८,दि.२८.४.१९८६) व (महाराष्ट- रोजगार हमी अधिनियम, १९७७, कलम १ - १५)

**जिल्हा स्तरीय रोजगार हमी योजना समितीचे सदस्य –** या समित्यांवर एक खासदार, दोन आमदार, तसेच मागासवर्गीय समाजाचे दोन सदस्य, दोन अशासकीय सदस्य व रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करणाऱ्या मजुराचे अथवा नोंदणी केलेल्या शेतमजूर संघाचे दोन प्रतिनिधी (एकूण ६) यांना अशासकीय सदस्य म्हणून नेमण्याचे अधिकार जिल्हा पालकमंत्री यांना आहेत व त्यांच्या निर्णयाप्रमाणे जिल्हाधिकारी या नियुक्तीचे आदेश काढतात व आदेशाची प्रत शासनाच्या नियोजन विभागाकडे सादर करतात. राज्य रोजगार हमी परिषदेचे जे सदस्य जिल्हास्तरीय रोजगार हमी समितीवर सदस्य म्हणून नियुक्त झालेले नाहीत, त्यांना त्यांच्या राहत्या जिल्ह्यातील जिल्हास्तरीय रोजगार हमी समित्यांवर ''कायम निमंत्रित, म्हणून बोलाविण्यात येते. प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास गट) यांना या समितीवर ''कायम निमंत्रित म्हणून बोलाविण्यात येते.

**जिल्हा समितीची कार्यकक्षा** (महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७, कलम ५, १९.३.२)

ही समिती जिल्ह्यात रोजगार हमी योजनेखाली घ्यावयाच्या कामाच्या नीलप्रतीस मान्यता देते. तसेच ही समिती त्यांच्या संबंधित अधिकारितांमध्ये योजनेच्या अंमलबजावणीवर वेळोवेळी देखरेख ठेवते, आढावा घेते आणि अधिक परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी त्यांचे मते आवश्यक असतील अशा उपाययोजना जिल्हाधिकाऱ्यांस, विभागीय आयुक्तांस, राज्य शासनास व राज्य रोजगार हमी परिषदेला सुचविते. विभागीय आमि जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांनी रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीसंबंधी केलेल्या निरीक्षण/तपासणी अहवालाचे परीक्षण आणि पाठपुरावा ही समिती करते. यासाठी प्रत्येक निरीक्षण अधिकाऱ्याने त्यांच्या निरीक्षण/तपासणीसंबंधीच्या अहवालाची प्रत सदस्य-सचिवांस नियमित विनाविलंब पाठविणे जरुरीचे असते. जिल्हासमिती जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीशी संबंधित असलेल्या व इतर अधिकाऱ्यांना बोलाविण्यात सक्षम आहे.

**पंचायत समितीस्तरीय रोजगार हमी योजना समितीचे सदस्य**

पंचायत समिती स्तरावरील रोजगार हमी योजना समितीचे अध्यक्ष नेमण्याचे त्याचप्रमाणे मागासवर्गीय समाजाचे दोन सदस्य, अशासकीय दोन सदस्य व रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करणाऱ्या मजुरांचे अथवा नोंदणी केलेल्या शेतमजूर संघाचे दोन प्रतिनिधी (एकूण ६) यांना अशासकीय सदस्य म्हणून नेमण्याचे अधिकार जिल्हा पालकमंत्री यांना आहेत आणि त्यांच्या निर्णयाप्रमाणे जिल्हाधिकारी या नियुक्तीचे आदेश काढतात व आदेशआची प्रत शासनाच्या नियोजन विभागाकडे सादर करतात.

**पंचायत समितीस्तरीय रोहयो समितीची कार्यकक्षा**

पंचायत समिती क्षेत्रात रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीसंबंधित असलेल्या आणि इतर अधिकाऱ्यांना बोलाविण्यास ही समिती सक्षम आहे.ही समिती त्यांच्या संबंधित अधिकारितांमध्ये योजनेच्या अंमलबजावणीवर वेळोवेळी देखरेख ठेवते, आढावा घेते आणि

अधिक परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी त्यांच्या मते आवश्यक असतील अशा उपाययोजनांसंबंधी समिती अधिकाऱ्यांस, जिल्हाधिकाऱ्यास, विभागीय आयुक्तास, राज्य शासनास, जिल्हा रोजगार हमी समितीस व राज्य रोजगार हमी परिषदेला सुचविते. निरीक्षण/तपासणी अधिकाऱ्यांनी संबंधित पंचायत समिती क्षेत्रात रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीसंबंधीचे केलेल निरीक्षण/तपासणी अहवालाचे परीक्षण आणि पाठपुरावा ही समिती करते. यासाठी प्रत्येक निरीक्षण/तपासणी संबंधीच्या अहवालाची प्रत अधिकाऱ्यांनी संबंधित सदस्य-सचिवांस नियमित विनाविलंब पाठविणे जरुरीचे असते.

### ३) पंचायत समिती क्षेत्रातील कामांची तपासणी करण्यासाठी स्थानिकस्तरीय समिती

### (लोकल वर्क्स कमिटी)

**समितीची नेमणूक** (शा.नि.,नि.वि.क्र.इजीएस-१३८५/४७/इएमपी-८,दि.१८.१२.१९८५)

रोजगार हमी योजनेच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी व गैरप्रकारास आळा घालण्यासाठी ह्या समित्या नेण्यात येतात. रोजगार हमी योजनेखालील कामावर मजुरांची हजेरी १०० किंवा त्याहून जास्त झाल्यास त्या कामासाठी वर्ग-२ किंवा त्यावरील दर्जाचे पंचायत समिती स्तरीय अंमलबजावणी अधिकारी (उदा. उपअभियंता, उपविभागीय मृदसंधारण अधिकारी वनक्षेत्रपाल इ.) यांना स्थानिकस्तरीय समिती नेमण्याचे अधिकार आहेत.

**रचना** (१९.४.२, शा.नि.,नि.वि.क्र.इजीएस-१३८५/४७/इएमपी-८, दि.१८.१२.१९८५)

ज्या गावाच्या परिसरात रोजगार हमी योजनेचे काम चालू असेल त्या गावात राहणारे जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य किंवा पंचायतस्तरीय रोजगार हमी समितीचे सदस्य, संबंधित जिल्ह्यातील जिल्ह्याचे सरपंच, पोलिस पाटील, स्थानिक शाळेतील प्राचार्य, शिक्षक, गावातील सहकारी सोसायटीचे अध्यक्ष यापैकी एका व्यक्तीची या समितीच्या अध्यक्षपदी नेमणूक करतात. वरीलपैकीच इतर एका व्यक्तीची नेमणूक सदस्य म्हणून करतात. कामावरील मजुरांचे प्रतिनिधी म्हणून तेथे काम करणाऱ्या मजुरांपैकी २ मजुरांची (त्यापैकी एक स्त्री मजूर असावी) सदस्य म्हणून नेमणूक करतात.

**कार्यक्षेत्र**

ही समिती संबंधित कामांस वेळोवेळी भेट देऊन मजुरांना द्यावयाच्या सोयी सवलतीच्या उपलब्धतेची खात्री करून घेते. मजुरांचे हजेरीपट तपासून उपस्थित मजूर आणि हजेरीपटावरील मजुरांची नावे पडताळून पाहते. देय असलेली मजुरी वेळेवर व पूर्णपणे देण्यात आली किंवा कसे, मजुरांना धान्य देण्याचे आदेश असल्यास देय असलेली धान्य कुपने देण्यात येतात किंवा कसे इत्यादीबाबत तसेच धान्य कुपन्सवर धान्य मिळण्यासाठी अडचण असल्यास त्याबाबत तपशीलवार तपासणी करते. याशिवाय मजुरांच्या काही तक्रारी असल्यास त्याचे निराकरण करून किंवा योग्य ती दखल घेण्याच्या दृष्टीने ही समिती कार्यवाही करते.

समितीने वेळोवेळी दिलेल्या भेटीसंबंधीचे अहवाल पंचायत समिती स्तरावरील रोजगार हमी समितीच्या सचिवांकडे सादर केले जाऊन व त्याची एक प्रत जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवली जाते. पंचायत समिती स्तरावरील रोजगार हमी समितीचे सचिव वरील अहवालातील त्रुटींचा पाठपुरावा करून आपला अहवाल पंचायत समिती स्तरावरील रोजगार हमी समिती पुढे सादर करतात.

### ४) विधान मंडळ रोजगार हमी योजना समिती

महाराष्ट्र विधानसभा नियमावलीनुसार विधानमंडळ आमदारांची एक रोजगार हमी योजना समिती नेमत असते. दरवर्षाचे विधानसभेचे पहिले अधिवेशन सुरू झाल्यावर व विधानसभा नव्यानेच गठित केली असल्यास विधानसभेचे पहिले अधिवेशन सुरू झाल्यावर विधानमंडळाच्या सदस्यांमधून ही समिती नेमली जाते. या समितीमध्ये जास्तीत जास्त २५ सदस्य असतात. प्रत्येकी जास्तीत जास्त २० सदस्य विधानसभेच्या अध्यक्षांकडून व जास्तीत जास्त ५ सदस्य विधानपरिषदेच्या सभापतींकडून नेमले जातात. नवीन समिती नेमली जाईपर्यंत पहिल्या समितीचे सदस्य अधिकारपदी राहतात. ही समिती खालील कामे पाहते-

राज्य सरकारच्या रोजगार हमी योजना कामकाजांची तपासणी व मूल्यांकन करणे व या योजनेच्या अंमलबजावणीतील दोष व उणिवा शोधून काढून त्यावरील उपाययोजना सुचविणे व अशा प्रकारे या योजनेमध्ये अभिप्रेत असलेले लाभ मिळतील अशा सुधारणांची शिफारस करणे.

ही समिती आपला अहवाल विधानसभेला सादर करते.

- *शासकीय यंत्रणेतर्फे होणारे नियमन वंचितांच्या हिताचे असावे व ते (केवळ कागदावर न राहता) प्रत्यक्षातही यावे यासाठी स्वयंसेवी संघटना-संस्था काय करू शकतील?*
- *विविध स्तरांवरील जनतेच्या सहभागाची तरतूद प्रत्यक्षात येण्यात कोणत्या अडचणी येऊ शकतात? या अडचणींवर मात करून जनसहभागासाठीच्या तरतुदी परिणामकारकपणे कशा वापरता येतील?*
- *वंचितांचे तसेच स्वयंसेवी संघटना-संस्थांचे रोहयोच्या नियमन-प्रक्रियेवर परिणामकारक नियंत्रण येण्यासाठी कोणते पर्याय नव्याने सुचवता येतील?*

## ६) रोहयोच्या गाभ्याला मारक ठरू शकणारे प्रस्ताव/बदल

रोहयोतील काही शासन-निर्णयांचा विचार करताना जाणवते की, रोहयोच्या मूलभूत गाभ्याशी विसंगत -त्याला मारक असेही काही प्रस्ताव/बदल शासकीय पातळीवरून केले गेलेले आहेत. हे प्रस्ताव गेल्या काही वर्षांमध्ये अशा प्रस्तावांची वारंवारिता जास्त दिसते. रोहयो वंचिताभिमुख करताना असे प्रस्ताव कसे हाताळायचे, त्यासाठीचे संघटन व धोरणवकिलीचे प्रयत्न कसे करायचे याच्या चर्चेसाठी प्राथमिक संदर्भ पुरवतील अशा काही शासन निर्णयांची मांडणी खाली केलेली आहे.

**विवक्षित काम पुरविण्याची जबाबदारी नाही**

(सा. ग्रं. १:३.२.४,शा.नि.,नि.वि.क्र.रोहयो-१०८६/प्र.१५/इएमपी-१२, दि.१७ एप्रिल १९८६ व शा.नि.,नि.वि.क्र.रोहयो-१०८६/प्र.१५/इएमपी-१२,दि.६.४.१९८७)

रोजगाराची मागणी करणाऱ्या व्यक्तीस कामाची निवड करण्याचा हक्क नाही. त्यांनी सांगितलेले काम स्वीकारले पाहिजे. तसेच त्यांना कामाच्या जागेची निवड करण्याचा हक्क नाही. पंचायत समिती क्षेत्रात आणि जिल्ह्यातील कोठेही कामावर त्यांना जावे लागेल.

रोहयो कामांच्या आखणीवर स्थानिक वंचितांचे नियंत्रण येऊ नये यासाठी वरील शासन निर्णयाचा वापर अर्थातच करता येऊ शकतो. ही अंगभूत मर्यादा दूर कशी करायची याचा विचार होणेही गरजेचे आहे.

**स्वयंसेवी संस्थांना काम देणे**

(सा. ग्रं. १: २१.१२ , शा.नि.,नि.वि.क्र.इजीएस-१२८७/प्र.८४,रोहयो-६, दि.९.३.१९८७)

जिल्हाधिकाऱ्यांनी अशा नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांची यादी त्यांच्याकडे ठेवावी व कार्यान्वयीन यंत्रणांना वेळोवेळी पुरवावी. अशाप्रकारे केलेल्या कामाला जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक वृत्तपत्रात वेळोवेळी प्रसिद्धी द्यावी व अधिकारी प्रकल्पात अशा प्रकारच्या स्वयंसेवी संस्थांना या कामात सहभागी करून घ्यावे. कार्यान्वयीन यंत्रणांनी अशा नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांनाच कामे द्यावीत.

स्वयंसेवी संस्थांचा सहभाग हा केवळ अंमलबजावणीपुरता, तोही दिलेले काम राबवणे एवढ्यापुरता मर्यादित कसा झालेला आहे हे खालील शा. निं मधून दिसून येते तसेच रोहयोच्या एकूण कारभार प्रक्रियेतच स्वयंसेवी संस्थांची सकारात्मक व ठोस भूमिका असण्याची गरजही त्यातून अधोरेखित होतेः

**अर्थसंकल्पीय नियंत्रण व कार्यपद्धती – रोहयोत सर्वंकष सुधारणा अकुशल : कुशल प्रमाणात बदल** (शा.नि.,नि.वि.क्र.इजीएस / ६ फेब्रुवारी १९९९)

रोहयोंतर्गत श्रमप्रधान कामे घ्यावयाची आहेत. त्याप्रमाणे शासन निर्णय २०.९.७४ नुसार ज्या कामात अकुशल भाग किमान ६०% आहे. अशी कामे रोहयो खाली घ्यावयाची आहेत. म्हणजेच कामातील अकुशल : कुशल प्रमाण ६०:४० असणे आवश्यक आहे. तथापि गेल्या २५ वर्षाच्या काळात कुशल भागातील साहित्यांच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ आहे व तसेच फार मोठ्या प्रमाणात रोहयोखाली कामे झालेली आहेत. त्याचा परिणाम म्हणजे ६०:४० प्रमाणात प्रामुख्याने तलावांच्या व रस्त्यांच्या कामांची अंदाजपत्रके बसतील अशी स्थळे (साईट्स) संपुष्टात येत आहेत. तलावासारखी जलसंधारणाची कामे व रस्त्याच्या कामाची मजूर क्षमता व उपयुक्तता लक्षात घेता ती कामे मोठ्या प्रमाणात रोहयोखाली होणे आवश्यक आहे. त्यासाठी या कामाकरिंता रोहयोचे अकुशलःकुशल प्रमाण ५१:४९ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

वरील निर्णयाप्रमाणे पुढील प्रकारची कामे : १. लघुपाटबंधारे तलाव २. पाझर तलाव ३. गाव तलाव ४. माजी मालगुजारी तलाव ५. वनतळी ६. गॅबियन बंधारे ७. रस्ते या कामांकरिता रोहयोचे अकुशलःकुशल प्रमाण ५१:४९ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

मात्र, मृदसंधारण, सामाजिक वनीकरण, वनीकरण, फलोत्पादन, पाणवहाळ क्षेत्रातील कामे इत्यादी कामे रोहयोखाली करण्यासाठी त्यांचे अकुशल : कुशल प्रमाण पूर्वीप्रमाणेच ६०:४० असेच आहे.

**रोहयोंतर्गत रस्त्यांच्या कामाकरिता लागणाऱ्या बांधकाम साहित्याच्या वाहतुकीची कामे तसेच मुरूम व माती दबाईची कामे देण्याबाबत सूचना** (शा.नि.,नि.वि.क्र.इजीएस /३० जानेवारी २००२)

रस्त्यांच्या बांधकामाकरिता लागणाऱ्या साहित्याची उदा. डबर, खडी व मुरूम इत्यादीच्या वाहतुकीची कामे तसेच खडी, मुरूम व माती दबाईची कामे शक्यतो शासकीय यंत्रसामग्रीचा वापर करून करण्यात यावीत. अपवादात्मक परिस्थितीत शासकीय यंत्रसामग्री उपलब्ध नसल्यास ती वस्तुस्थिती अभिलेखावर नमूद करून उपरोक्त कामे नियमानुसार कंत्राटी पद्धतीने तसेच मजूर सहकारी संस्थांना व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना देण्यास हरकत नाही.

१. रोजगार हमी योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत राज्यात फार मोठ्या प्रमाणावर कामे झालेली आहेत. तसेच राज्य व जिल्हा नियोजनांतर्गत जिल्हा परिषद, केंद्र शासनाच्या योजना इत्यादी माध्यमातून पण बरीच कामे झालेली आहेत. त्यामुळे गावाजवळ उपलब्ध कामांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. नियोजन विभाग (शा.नि.क्र.वानियो-२००२/प्र.१३२/रोहयो-६,दि.२६ मे २००३)

**सन २००३-०४ या वित्तीय वर्षासाठी वितरित केलेल्या अनुदानापैकी अनुदान परत घेणे व त्याचे पुनर्वितरण करणे** (महसूल व वन विभाग शा.नि.क्र.एससीवाय-११०३/प्र.क्र.११२/म-११, दि.३१ मार्च २००४)

मागणी क्र. सी-११-६४०१-पीक संवर्धन विषयक कर्जे-८००-इतर कर्जे-८००(००)(०१) शेतकऱ्यांना तगाई कर्जे (६४०१००१७) (योजनेतर) या लेखाशीर्षाखाली सन २००३-०४ या चालू वित्तीय वर्षात अपेक्षित खर्च भागविता यावा म्हणून रूपये १०.०० लाख अनुदानाची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती. नियंत्रण अधिकाऱ्यांकडून (विभागीय आयुक्त) प्राप्त झालेल्या आठमाही सुधारित अंदाजानुसार त्यांना रु. ६.५० लाख सुधारित तरतूद दिनांक ३१ मार्च, २००४ पर्यंत खर्च करण्यास प्राधिकृत करण्यात आले व रूपये ३.५० लाख अनुदानाची रक्कम पूर्वीच प्रत्यार्पित करण्यात आली होती. आठमाही सुधारित अंदाजानुसार नियंत्रण अधिकाऱ्यांना वितरित कड्ण्यात आलेल्या रूपये ६.५० लाख अनुदानाच्या रकमेतून दिनांक ३१ मार्च, २००४ पर्यंत कोणताही खर्च होणार नसल्याने, ती सर्व रक्कम शासनास प्रत्यार्पित करण्यात आली आहे. सबब, या लेखशीर्षकाखाली करण्यात आलेली सर्व अर्थसंकल्पीय तरतूद, रु.१०.०० लाख ही रक्कम समर्पित करण्यात आली आहे.

**रोजगार हमी योजनेचे पुनर्विलोकन व सुधारणा करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीचे फेर पुनर्गठन** (नियोजन विभाग शा.नि.क्र. पुसुस-२००३/प्र.क्र.६/रोहयो-९,दि.२ जुलै २००४ वाचा - शासन निर्णय क्र. पुसुस-२००३/प्र.क्र.६/रोहयो-९,दि.१६ जून, २००३)

संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयाद्वारे रोजगार हमी योजनेचे पुनर्विलोकन व सुधारणा करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीचे फेर पुनर्गठन करण्यात आलेले आहे. सदर समितीला शासनाने दि. २९ फेब्रुवारी, २००४ पर्यंत अहवाल सादर करण्याची मुदत दिली आहे. तथापि, सदर कालावधीत समितीला अहवाल सादर करता आला नाही. ही बाब लक्षात घेता सदर समितीस या शासन निर्णयाद्वारे दि. ३१ जुलै २००४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

**सुधारित दरपत्रक** (शासन निर्णय १६ ऑगस्ट २००४)

रोजगार हमी योजनेंतर्गत कामावरील मजुराने परिश्रमपूर्वक प्रतिदिन ७ तास काम केल्यावर त्याला संबंधित परिमंडळाकरिता निश्चित केलेल्या शेतमजुरांच्या किमान वेतनाएवढी मजुरी मिळेल अशा रीतीने रोजगार हमी योजनेवरील मजुरीचे दरपत्रक निश्चित करण्यात येत असते. शासनाने शेतमजुरांचे किमान वेतन सुधारणाविषयी उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, यांची अधिसूचना क्रमांक एमडब्ल्यू -१०९८/सीआर-३९०/कामगार-७, दि. २३ मार्च २००१ काढली आहे. त्यानुसार शासनाने शेतमजुरांचे किमान वेतन परिमंडळ-४, करिता प्रतिदिनी रुपये ४५, परिमंडळ-३ करिता प्रतिदिनी रुपये ४७, परिमंजळ-२, करीता प्रतिदिनी रु.४९, परिमंडळ-१करिता प्रतिदिनी रुपये ५१, असे दर प्रस्तावित केले आहेत. त्यानुसार रोजगार हमी योजना कामावरील अकुशल मजुरीचे दरपत्रक दिनांक २६ मार्च २००१ पासून सुधारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याप्रमाणे रोहयोच्या अकुशल कामाच्या मजुरीचे दरपत्रक परिमंडळ-४, करिता प्रतिदिनी रुपये ४५, परिमंडळ-३, करीता प्रतिदिनी रुपये ४७, परिमंडळ-२ करिता रु.४९, परिमंडळ-१ करिता प्रतिदिनी रु.५१ असे निर्धारित करण्यात आले आहेत. या निर्णयामुळे शासन निर्णय नियोजन विभाग, क्र. मजुरी-२००१/प्र.१९/रोहयो-१०, दि. १० एप्रिल २००१ अन्वये विहित केलेले दरपत्रक अधिक्रमित होत आहे.

## आढावा

या सर्व शासन-निर्णयांकडे एकत्रित बघितल्यास प्रकर्षाने दिसून येते की रोहयोची संपूर्ण कारभार प्रक्रिया वंचिताभिमुख होण्यासाठी तिच्या अंगभूत संरचनेतच अनेक बलस्थाने आहेत. त्यामुळे रोहयोच्या प्रभावी अंमलबजावणीचाच काय तो प्रश्न आहे, हे अनेकअंशी खरे असले तरी (विशेषतः इतर अनेक योजनांच्या तुलनेत) तरीही १९७७-२००४ अशा प्रदीर्घ कालावधीत योजनेत शासकीय पातळीवर होते गेलेले बदल बघता, 'प्रश्न केवळ अंमलबजावणीचाच आहे' या गृहीतकाचा फेरविचार करण्याची गरज आहे का, या प्रश्नाचा गंभीरपणे विचार व्हावा असे वाटते. याच संदर्भातील काही बदलाचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न या मांडणीच्या शेवटी केलेला आहे.

१९७७-२००४ या कालावधीतील शासन-निर्णयांचा आढावा घेताना रोहयोमध्ये कोणकोणते बदल होत गेलेले आहेत. याचा एक पटच डोळ्यासमोर उलगडतो. या बदलांचे स्वरूप बघता, १९७७-२००४ या कालावधीचे *१९७७-८८; ८९-९२ व ९३-२००४* अशा तीन ठळक टप्प्यांमध्ये वर्गीकरण करता येऊ शकेल.

**१९७७-८८:**

- प्रामुख्याने योजनेची अंमलबजावणी, तिचे नियमन, मजुरांसाठी रास्त तरतुदी, यावर भर
- 'जनतेचा सहभाग' या मुद्द्याचा अंशतः विचार
- कोरडवाहू जमिनीवर फळ लागवड, पाणवहाळ क्षेत्र विकास अशा कार्यक्रमांची प्रायोगिक तत्त्वावर सुरुवात

**१९८९-९२:**

- 'श्रमशक्तीतून ग्रामविकास कार्यक्रम - स्थानिक जनतेचा कार्यक्रमाच्या आखणीपासून सहभाग, गाव-विकासाचा एकात्मिक विचार, संपूर्ण गावाचा श्रमदानाच्या स्वरूपात सहभाग, पूरक योजनांची जोड, अशी महत्त्वाची वैशिष्ट्ये स्थानिक नैसर्गिक संसाधनांच्या व्यवस्थापन व संवर्धनाचा विचार
- फलोद्यान व जवाहर-विहिरींचे कार्यक्रम प्रायोगिक तत्त्वावरून मोठ्या प्रमाणात सुरू
- प्रशासकीय यंत्रणेची कार्यक्रमाबाबतची अनास्था, अकार्यक्षमता, स्थानिक जनतेतील एकोप्याचा व संघटनांचा तसेच जाणीवजागृतीचा अभाव. यामुळे 'या कार्यक्रमाला मागणी नाही, हा कार्यक्रम करणे व्यवहार्य नाही', असे अनुभव-वातावरण तयार झाले.

**१९९२ :**

- 'श्रमशक्तीतून....जलसंधारण कार्यक्रमात वर्ग' करण्यात आला, म्हणजेच बंद करण्यात आला.
- जलसंधारण कार्यक्रमाची मोठ्या प्रमाणावर सुरुवात.

**१९९३-२००४ :**

- विविध प्रकारची जलसंधारण कामे-पाझर तलाव, गाळ काढणे, शेततळी, पिण्याच्या पाण्याच्या विहिरी, कालवे व वित्तरिका - दुरुस्ती, जलबांध, महात्मा फुले-जलसंधारण अभियान
- रस्ते-बांधकाम संबंधित कामे
- तुती - कोष लागवडीद्वारे रेशीम उत्पादन योजनेची सुरुवात
- पडीक जमीन-विकास कार्यक्रम, भूसंधारण-भूविकास यांचा ओझरता उ्रेख, तुरळक उल्लेख
- एसजीएसआरवाय अंतर्गत मजुरीबरोबरच गहू - वाटप

रोहयोखाली घेतल्या जाणाऱ्या कामांची व्याप्ती कशी बदलत तसेच प्रामुख्याने जलसंधारण-रस्ते यांच्यापुरती मर्यादित होत गेलेली आहे, हे या कालावधीतील शा.नि.मधून सहज स्पष्ट होते. श्रमशक्तीचा ठळक अपवाद वगळता स्थानिकांच्या सहभागाचा विचारही रस्त्यांच्या बांधकामांसाठी ग्रामसभेची मंजुरी' इतपतच राहिलेला आहे.

फलोद्यान, तुती लागवड अशा योजना अभिनव दिसत असल्या तरी हातावर पोट असणाऱ्या तळातल्या जनतेला केंद्रस्थानी ठेवून त्यांची आखणी झालेली नाही हेही उघड आहे. मजुरीबरोबरच धान्य-वाटप कार्यक्रमात हातावर पोट असणाऱ्या जनतेला दिलासा देण्याची ताकद काही अंशी असली तरीही त्यातील गैरव्यवहार सर्वश्रुत आहे. शिवाय, गहू हा महाराष्ट्रातील सर्व ठिकाणचा प्रमुख आहार नसतानाही रोजगार हमीवर सर्वत्र गहूच दिला जातो या विसंगतीचे स्पष्टीकरणही या कार्यक्रमातून मिळत नाही. त्याचप्रमाणे

हा दिलासा तात्पुरता आहे-दीर्घकालीन नाही, त्यातून वंचितांसाठी कोणतीही मत्ता निर्माण होत नाही. वंचितांच्या उपजीविकांची उत्पादकता वाढल्याने त्यांची अन्न-सुरक्षितताही वाढू शकते आणि धान्य पुरवण्याची गरजच राहणार नाही, या शाश्वत उपायाचा विचार झालेला दिसत नाही.

हे सर्व मुद्दे रोहयोखाली घेतल्या जाणाऱ्या कामांच्या व्याप्तीशी निगडित आहेत. विविध प्रकारच्या कामांतून अल्पभूधारक व वंचितांचा पोटापाण्याचा प्रश्न तात्पुरता सुटला असला, तरीही त्याचे दीर्घकालीन-कायमस्वरूपी उत्तर शोधण्याचे प्रयत्न अभावानेच झाले, हेच या मुद्द्यांमधून व त्यांच्याशी निगडीत शासन-निर्णयांमधून सूचित होते. त्याचप्रमाणे, किंबहुना त्यामुळेच, अल्पभूधारक व भूमिहिनांना दीर्घकालीन व थेट फायदा मिळू शकेल अशा रोहयो कामांची आखणी होण्याची गरजही या मुद्द्यांमधून अधोरेखित होते. अर्थातच अशा कामांची आखणी कशी होऊ शकेल हा धोरणवकिली व कृतीच्या आखणीसाठी एक महत्त्वाचा मुद्दा असू शकेल. म्हणजेच केवळ प्रभावी अंमलबजावणी होणे पुरेसे नसेल तर वंचिताभिमुख आखणी होणेही तितकेच महत्त्वाचे असेल.

कामांची व्याप्ती मर्यादित होणे हा जसा रोहयोच्या गाभ्याला (म्हणजेच दारिद्र्यनिर्मूलनाला) मारक, रोहयोच्या गाभ्याशी विसंगत असा बदल आहे, तसेच इतरही काही बदल रोहयोच्या आजपर्यंतच्या कारकीर्दीत मुख्यतः ९३-२००४ या टप्प्यात होत गेलेले आहेत. जसे की-

- जलसंधारणाच्या कामांसाठी ६०:४० हे अकुशलःकुशल कामांचे प्रमाण ५१:४९ असे बदलणे (मृद्संधारण, वनीकरण इ.) या कामांसाठी हे प्रमाण बदललेले नाही.
- अकुशल कामाची वाहतूक मर्यादा १५० मीटर अंतरावरून १०० मीटरवर आणणे
- खाजगी कंत्राटदारांना व यंत्रसामुग्रीच्या वाढत्या वापराला मान्यता
- (सुधारित दरपत्रक ) अकुशल बाबींची संख्या तसेच त्यासाठीचे मजुरीचे दर लक्षणीय प्रमाणात कमी होणे
- रोहयोच्या कामांची मागणी कमी झाल्याचे दर्शविणे(वापर न झाल्यामुळे रोहयो निधी नियोजन विभागाकडे परत करावा लागणे)

या बदलांसाठी कोणत्याही प्रकारे वंचित गटांना अथवा त्याच्यासाठी काम करणाऱ्या संस्था-संघटनांना निर्णय प्रक्रियेत स्थान देण्यात आलेले नाही. किंबहुना स्वयंसेवी-संस्था संघटनांना रोहयोच्या संपूर्ण कारभारप्रक्रियेत प्रभावीपणे सहभागी होता यावे यासाठी 'विविध पातळ्यांवरील रोजगार हमी समित्यांमध्ये शेतमजूर, मागासवर्गीय, स्त्रिया व शेतमजूर संघटना यांच्या जोडीने दोन अशासकीय सदस्य असावेत', या खेरीज कोणतीही स्पष्ट तरतूद वा सूचना रोहयोच्या संरचनेत केलेली दिसत नाही. या बदलांची व त्यांच्या परिणामांची खुली चर्चा तर सोडाच त्यासंबंधीची सर्व माहितीही खुली केली गेलेली नाही. रोहयोचे पुनर्विलोकन व सुधारणा समितीचा अहवाल पूर्ण व त्यामुळे प्रसिद्ध होणे सातत्याने लांबणीवर पडण्याचे कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण मिळालेले नाही. हा अहवाल लिहिण्याच्या प्रक्रियेतूनदेखील समितीवरील अशासकीय सदस्यांना (जे स्वयंसेवी क्षेत्राशी निगडित आहेत) वगळण्यात आले आहे. रोहयोचा कारभार वंचिताभिमुख व्हावा या उद्देशाने विधानसभा, राज्य, जिल्हा, पंचायत व स्थानिक अशा पातळ्यांवर समित्यांची संरचना करण्यात आली. पण वर निर्देशित केलेले बदल करताना या समित्यांनाही निर्णयप्रक्रियेतून काही वेळा वगळले गेलेले आहे.

म्हणूनच रोहयोची कारभारप्रक्रिया वंचित-भिमुख (वंचितांसाठी पारदर्शक, सहभागी व जाबदायी) कशी करायची, त्याचप्रमाणे वंचितांसाठी/वंचित गटांबरोबर काम करणाऱ्या संस्था-संघटनांचे त्यावर प्रभावी नियंत्रण कसे आणायचे, हा धोरणवकिली व कृतीची आखणी करण्यासाठी कळीचा प्रश्न असेल, असे नियंत्रण आल्याने खऱ्या अर्थाने वंचिताभिमुख (म्हणजेच अल्पभूधारक, भूमीहीन अशा गटांना उपजीविकेची कायमस्वरूपी हमी देणाऱ्या) कामांची आखणी होण्याच्या प्रक्रियेलाही गती व बळ मिळू शकेल. अर्थातच 'प्रश्न केवळ अंमलबजावणीचा आहे या भूमिकेऐवजी आखणी व अंमलबजावणी तसेच नियमन या सर्व पैलूंसाठी कृती व धोरणवकिलीची आखणी करणे महत्त्वाचे असेल.

या दोन्ही (१. वंचिताभिमुख - उपजीविकेची कायमस्वरूपी हमी देणाऱ्या कामांची आखणी व २. कारभार-प्रक्रियेवर वंचितांचे नियंत्रण) प्रश्नांच्या संदर्भात रोहयोच्या सध्याच्या चौकटीचा उपयोग कुठे करून घेता येईल या दृष्टीने निवडकच शासन-निर्णयांची मांडणी केलेली आहे, त्यामुळे ती सर्वसमावेशक नाही. हा उपयोग 'कसा करून घ्यायचा ' यासाठीच्या नेमक्या चर्चेसाठी प्राथमिक संदर्भ पुरवणे एवढाच या शासन-निर्णयांची मांडणी व त्यावर आधारित संक्षिप्त विश्लेषणाचा उद्देश आहे.

# भाग ३ रोहयो कामांची इतर योजनांशी पूरक सांगड

रोहयो कामांची इतर कार्यक्रम वा योजनांची सांगड घातल्यास रोहयोचा गाभा अधिक बळकट होऊ शकेल अशी कार्यकर्ते व अभ्यासकांची सूचना आहे. या पार्श्वभूमीवर, भूमिहीनांना रोहयोतून कायमस्वरूपी हमी कशी द्यायची या प्रश्नाच्या संदर्भात आदिवासी भागात 'निस्तार-हक्कांचा विचार करता येईल असे वाटते. निस्तार-हक्कावरील अभ्यास-साहित्याच्या आधारे रोहयोशी त्याच सांगड कशी घालता येईल याची प्राथमिक मांडणी खाली केलेली आहे. :

**भूमिहीनांना उपजीविकेची हमी मिळावी म्हणून रोहयोची निस्तार हक्कांशी सांगड** (संदर्भ : निस्तार हक्क-मोहन हिराबाई हिरालाल)

**निस्तार हक्क** (महाराष्ट्र भू राजस्व संहिता १९६६-कलम-१६०-१६७ व भारतीय वन-नीती १९८८०):

ज्यांचे जगणे वनावर अवलंबून असते अशा आदिवासी व इतर ग्रामीण गरीबांना वनापासून - वनातून मिळणाऱ्या जीवनावश्यक वस्तू मिळण्याचा हक्क (विनामूल्य चराई, विनामूल्य लाकूड, टिंबर, जळण किंवा इतर कोणतेही वन-उत्पादन, मुरूम, कंकर, वाळू, माती, दगड, इतर कोणतेही लघुखनिज कारागिरांना, आवश्यक असलेल्या वस्तू)

**निस्तार हक्काचे प्रत्यक्षात काय झाले?**

- सदोष निस्तार चौकशी, निस्तार ठरविण्यासाठी अशास्त्रीय निकष
- केवळ कागदोपत्री हक्क - नियोजन, व्यवस्थापन व संवर्धनाचा विचार नाही
- निस्तार हक्कांवर गदा आणणारा स्थानिकांचा सहभाग नाही
  (लोकांच्या बाजूने अनास्था, अडाणीपणा)
- चुकीची धोरणे-उदा.वनबंदोबस्त
- वनसंपत्तीची अवैध लूट (स्थानिकांकडून), अति चुकीचा वापर
- परिणामी- जंगलांचा ऱ्हास-निस्तार हक्कापासून वंचितपणा-स्थानिक गरिबांच्या उपजीविकेला धोका

**स्वयंसेवी संस्था/संघटना/प्रशासकांनी सुचवलेले उपाय :**

- निस्तार हक्क फक्त 'आज नको, तर सतत कायमचा'
- हक्काबरोबरच लोकसहभागातून व्यवस्थापन-संवर्धनाची योजना
- पूरक कार्यक्रमांची जोड - ग्रामवन
- जिथे अव्याप्त जंगल-जमीन स्थानिकांच्या निस्तार हक्कासाठी पुरेशी नसेल तिथे - ग्रामीणांच्या सहभागातून वनव्यवस्थापन (जेएफएम) कार्यक्रम, जलसंधारण, मृदसंधारण कार्यक्रम, रोजगार हमी योजना.

**निस्तार हक्क व रोहयो सांगड कशी घालता येईल?**

- जिल्हाधिकारी हेच रोहयो व निस्तार हक्क, प्रक्रियेचे प्रशासकीय प्रमुख
- निस्तार हक्कांची लोकसहभागातून नोंदणी
- जंगल वाढवणे, रोपवाटिका, मासेमारी, प्रोसेसिंग इत्यादींसारखी तसेच जल-मृदसंधारणाची कामे रोहयोमार्फत सुरू करणे

**अशी सांगड घातल्याने-**

- रोहयोतून आदिवासी/गरिबांच्या पारंपरिक उपजीविकांची उत्पादकता वाढवणारी कामे घेता येतील. भूमिहीनांना उपजीविकेची हमी मिळेल.
- आदिवासींच्या मानसिकता/गरजांचा विचार करून त्यानुरूप कामे सुरू केल्याने आदिवासींकडून रोहयोची मागणी वाढेल.
- लोकसहभागामुळे रोहयोच्या कारभाराची प्रक्रिया पारदर्शक होईल.
- निस्तार हक्क (सततचा) प्रत्यक्षात येईल

**यासाठी :**

- जिथे आदिवासी व इतर गरिबांच्या उपजीविका जंगलावर अवलंबून आहेत, तिथे निस्तार हक्क नोंदवण्याची व जिथे ती सदोष आहे तिथे योग्य पद्धतीने व्हावी यासाठीची प्रक्रिया सुरू करणे

- ग्रामसभांच्या माध्यमातून अभ्यासाच्या आधारे रोहयोसाठी मागणी उभी करणे- ही मागणी केवळ 'काम पाहिजे' अशी नसेल तर अमुक एका काळात, अमुक एका क्रमाने, अमुक प्रकारची कामे सुरू व्हावीत अशी असेल.
- हे प्रत्यक्षात येण्यासाठी नियोजन-मूल्यमापनाच्या संपूर्ण प्रक्रियेत सहभागासाठी असलेल्या विहित केलेल्या समित्यांमध्ये संघटना/संस्थांचा व शक्य तेथे प्रत्यक्ष लोकांचा सक्रिय सहभाग.
- स्थानिक आमदारांशी संस्था-संघटनाचा प्रभावी संवाद

> - *निस्तार हक्कांप्रमाणेच इतर कोणत्या योजनांची जोड रोहयोला देता येईल?*
> - *रोहयोतील मर्यादा (जसे की केवळ अकुशल काम, अतिश्रमाची कामे, इतर कामांच्या तुलनेत कमी मजुरी) दूर करण्यासाठी त्यांचा उपयोग कसा करता येईल?*
> - *अशी पूरक जोड देण्यातील संभाव्य धोके कोणते असतील?*
> - *त्यावर काय उपाय करता येतील?*

## भाग ४. कृती व धोरणवकिलीच्या शक्यता

कार्यकर्ते-अभ्यासक व शासकीय अधिकारी यांनी मांडलेल्या समस्या-उपाय-पर्याय आणि निवडक शासन-निर्णयांची मांडणी, यांचा रोहयोच्या पुनरुज्जीवनाच्या संदर्भात विचार करताना तीन प्रकारच्या शक्यता पुढे येतातः (१) अभ्यास मांडणी, (२) स्थानिक पातळीवरील कृती, (३) धोरणवकिलीसाठी संघटित प्रयत्न

**(१) अभ्यास व मांडणी :** रोहयोच्या कारभारातील पारदर्शकतेचा अभाव व रोहयोसंबंधी वस्तुस्थितीचा केला जाणारा विपर्यास यांच्या पार्श्वभूमीवर अभ्यास व समर्पक युक्तिवादाच्या मांडणीतून कृती व धोरणवकिलीच्या प्रयत्नांची ताकद वाढवता येऊ शकेल. उदा. निवडक शासन-निर्णयांची मांडणी व विश्लेषण, रोहयो कारभारावर वंचितांचे नियंत्रण व रोहयोतून उपजीविकेची दीर्घकालीन हमी कशी मिळवता येते याच्या अनुभवसिद्ध पद्धतींची मांडणी (बेस्ट प्रॅक्टिसेस्) रोहयोबाबत घेतल्या जाणाऱ्या आक्षेपांना समर्पक युक्तिवादांची मांडणी, 'रोहयोच्या पुनरुज्जीवनाची गरज यावर प्रसारमाध्यमांतून मांडणी इ.

**(२) स्थानिक पातळीवरील कृती :** रोहयोवर काम करणाऱ्या तसेच करू इच्छिणाऱ्या संस्था-संघटना गटांना आपापल्या स्थानिक परिस्थितीनुसार रोहयोतील कोणत्या बलस्थानांचा उपयोग कसा करायचा यांची आखणी करता येईल. त्यासाठी विचार-विनिमय व देवाण-घेवाणीच्या प्रक्रियेत सातत्य कसे राखायचे याचेही नियोजन करता येईल. त्याचप्रमाणे गावपातळीवरील कार्यकर्त्यांना रोहयोचा परिणामकारकपणे उपयोग करता यावा यासाठी काही सोपी साधनेही तयार करता येतील जसे की, प्रश्नावली, चेक-लिस्ट, तर काय कराल इ. साधनांचा वापर करून स्थानिक पातळीवरील कृतीला चालना तर मिळेलच, शिवाय त्यातून जमा होणारी माहिती व अनुभवांमुळे धोरण-वकिलीच्या प्रयत्नांनाही पाठबळ मिळू शकेल.

**(३) धोरण वकिलीचे प्रयत्न :** विचार-विनिमय, अभ्यास व अनुभव यांच्या आधारे धोरणवकिली कोणकोणत्या मुद्द्यांसाठी करायची, त्यासाठीची आखणी कशी-कोणत्या टप्प्यांनुसार करायची याची निश्चिती करता येऊ शकेल. रोहयोतील अंगभूत बलस्थानासंबंधीचे मुद्दे व नव्याने समाविष्ट करायचे मुद्दे, संघटित प्रयत्न बळकट करण्यासाठीची गटबांधणी, लिखाण, दबाव, जनहितयाचिका अशा प्रकारचे धोरण वकिलीचे पर्याय, यासारख्या मुद्द्यांचा त्यासाठी विचार करता यावा.

अभ्यास-मांडणी, कृती व धोरण वकिली या तीनही प्रकारच्या विधायक हस्तक्षेपातून रोहयो खऱ्या अर्थाने वंचिताभिमुख करण्यासाठी विविध प्रकारचे, प्रयत्न व्यापक पातळीवर परंतु संघटितरीत्या सुरू होऊ शकतील.

हस्तक्षेपाचे वरील पर्याय, त्यात अनेक बदल होऊ शकतील याची पूर्ण जाणीव ठेवून, चर्चेसाठी काही एक चौकट पुरवण्याच्या उद्देशाने मांडलेले आहेत हे आवर्जून नमूद करावेसे वाटते.